





पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३० ■ शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# सत्याचा विजय झाला... !

## दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणः केजरीवाल, सिसोदियांची निर्दोष मुक्तता



वृत्तसंस्था २७ फेब्रुवारी

**दिल्ली :** दिल्लीतील कथित मद्य घोटाळा प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची राऊज एव्हेन्यू न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. यामुळे केजरीवाल आणि सिसोदिया यांना मोठा दिलासा मिळाला आहे. 'सत्याचा विजय झाला आहे, केजरीवाल, सिसोदिया भ्रष्टाचारी नाहीत, इमानदार आहेत', अशा शब्दात केजरीवाल यांनी निकालाचे स्वागत केले. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले.

### असे आहे कथित मद्य घोटाळा प्रकरण!

२०२२ मध्ये दिल्ली मद्य धोरणात गैरप्रकार झाल्याचा आरोप तत्कालिन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्याविरोधात करण्यात आला होता. १०० कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला होता. सीबीआयकडून याबाबत विविध पुरवणी आरोपपत्रही दाखल केली होती. अरविंद केजरीवाल यांच्यासह २३ जणांची नावे आरोपपत्रात नमूद करण्यात आली होती.

नरेंद्र मोदी आणि अमित शहांनी सर्वात मोठा राजकीय कट रचला, आम आदमी पक्षाच्या पाच मोठ्या नेत्यांना तुरुंगात टाकले. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच मुख्यमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीला तुरुंगात ठेवण्यात आले. सिसोदियांना दोन वर्षे तुरुंगात ठेवले. केजरीवाल भ्रष्टाचारी आहेत, असा आरोप करण्यात, पण मी भ्रष्टाचारी नाही', असे म्हणताना केजरीवालांना अश्रू अनावर झाले. 'केजरीवाल भ्रष्ट आहेत म्हणत आमच्यावर टीका करण्यात आली. पण, केजरीवाल भ्रष्टाचारी नाही. सिसोदिया भ्रष्टाचारी नाही.

### प्रकरणातील सर्वांची सुटका

दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणातील सर्व २३ आरोपींना न्यायालयाने दोषमुक्त केले. यात कुलदीप सिंग, नरेंद्र सिंग, विजय नायर, अभिषेक बोईनपल्ली, अरुण पिल्लई, मुथा गौतम, समीर महेंद्रू, मनीष सिसोदिया, अमनदीप सिंग धल्ल, अर्जुन पांडे, बुच्चीबाबू गोरंटला, राजेश जोशी, दामोदर प्रसाद शर्मा, प्रिन्स कुमार, अरविंद कुमार सिंग, चरणप्रीत सिंग, के. कविता, अरविंद केजरीवाल, दुर्गेश पाठक, अमित अरोरा, विनोद चौहान, आशिष चंद माथूर आणि सरथ रेड्डी आदींचा समावेश आहे.

### न्यायालयाने सीबीआयला फटकारले

तपासातील त्रुटींवरुन न्यायालयाने सीबीआयला कठोर शब्दांत फटकारले. मोठ्या आरोपपत्रात अनेक त्रुटी आहेत शिवाय साक्षीदार किंवा सबळ विधानाने आरोप सिद्ध केले नाहीत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. सीबीआय सिसोदिया यांच्याविरुद्ध प्रथमदर्शनी खटला तयार करण्यात अपयशी ठरली, असेही न्यायालयाने म्हटले. तर, कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय केजरीवाल यांना गोवण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले.

### पक्ष नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न

या कथित घोटाळ्यात केजरीवाल १७७ दिवस, संजय सिंह १८१ दिवस अन् सिसोदिया तब्बल ५१० दिवस जेलमध्ये राहून निर्दोष सुटले आहेत. विशेष म्हणजे हे तीन महत्त्वाचे नेते जेलमध्ये असल्याने पक्ष दिल्ली निवडणुकीत कमकुवत झाला. यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने विजय मिळवला. आम आदमी पक्षाची मोठी पीछेहाट झाली. पक्ष नेस्तनाबूत करण्यासाठीच हे षडयंत्र रचल्याचे केजरीवाल माध्यमांशी बोलताना म्हणाले.

# सीलबंद लिफाफ्यातून प्रश्नपत्रिका गहाळ?

## रसायन-भौतिकशास्त्रानंतर गणिताचाही पेपर लीक...!

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**नागपूर :** नागपूरमध्ये बारावी परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे. रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्रानंतर आता गणिताचाही पेपर फुटल्याचे डिजिटल पुरावे समोर आल्याने हे प्रकरण केवळ अपघाती नसून संघटित रॅकेट असल्याचा संशय बळावला आहे. १६ फेब्रुवारीला रसायनशास्त्र आणि १८ तारखेला भौतिकशास्त्राचा पेपर फुटल्याचे उघड झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान अटकेतील आरोपींनी आपले मोबाईल फॉरमॅट केल्याचे निष्पन्न झाले. मात्र, पोलिसांनी डिलिट केलेला डेटा पुन्हा रिकव्हर केला असता २१ फेब्रुवारीला गणिताचा तिसरा पेपरही प्रसारित झाल्याचे डिजिटल पुरावे समोर आले. विशेष म्हणजे, सेंट उर्सुला शाळेतील एका विद्यार्थिनीच्या मोबाईलवरून १६ फेब्रुवारीला रसायनशास्त्र आणि १८ फेब्रुवारीला भौतिकशास्त्राचा पेपर प्रसारित झाल्याचे आधीच उघड झाले होते. आता गणिताचा पेपरही त्याच साखळीतून बाहेर गेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. काही परीक्षा केंद्रांवर विज्ञान शाखेच्या प्रश्नपत्रिका कमी प्रमाणात पोहोचल्याची तक्रार पर्यवेक्षकांनी केली आहे. २५ ऐवजी २४ प्रश्नपत्रिका मिळाल्याचे निदर्शनास आले. फिजिक्स, केमिस्ट्री, गणित आणि बायोलॉजीच्या पेपरसंदर्भात ही बाब घडल्याने संशय अधिक गडद झाला आहे. प्रेसमधून सीलबंद पाकिटे थेट परीक्षा केंद्रांवर पाठवली जात असताना लिफाफ्यातून प्रश्नपत्रिका कशा गायब झाल्या, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पर्यवेक्षकांनी केंद्रप्रमुखांमार्फत बोर्ड अधिकाऱ्यांकडे अहवाल पाठवला असून, बोर्डाने तपास सुरू केल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

पेपरफुटी प्रकरणात चार जणांना अटक झाली असून काही महाविद्यालयांशी टायअप असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. सीलबंद लिफाफ्यातील प्रश्नपत्रिका कमी पडण्याचा प्रकार आणि डिजिटल माध्यमातून पेपर प्रसारित होण्याच्या घटनांमध्ये काही संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. रसायन, भौतिकशास्त्र आणि गणित या तिन्ही विषयांचे पेपर फुटल्याने बारावी परीक्षेच्या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### पाच सदस्यांचे विशेष तपास पथक

या प्रकरणात शिक्षक निशिकांत मून याला अटक करण्यात आली आहे. तसेच एक्सेलन्ट अकादमीचे मुस्तफा खान आणि जुनेद जावेद यांनाही जेरबंद करण्यात आले आहे. एका विद्यार्थ्याला जामीन मंजूर झाला आहे. मात्र, या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार असलेला पाचवा आरोपी अद्याप पोलिसांच्या तावडीत सापडलेला नाही. त्याचा शोध घेण्यासाठी पाच सदस्यांचे विशेष तपास पथक कार्यरत आहे.

# त्या विमान अपघाताचा आज येणार अहवाल!

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**मुंबई :** अजित पवार विमान अपघाताचा प्राथमिक तपास अहवाल २७ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. ब्लॅक बॉक्समधील डेटा आणि घातपाताच्या संशयावर या अहवालातून मोठा खुलासा होण्याची शक्यता आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला आज एक महिना पूर्ण होत असतानाच, या प्रकरणातील 'प्राथमिक तपास अहवाल' आज सायंकाळी प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे.

# अकोल्याच्या ई-भूमिती प्रकल्पाची 'स्कॉच' पुरस्कारासाठी निवड

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अकोला :** अकोला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या 'e-Bhoomitied Project' या नावीन्यपूर्ण उपक्रमाची प्रतिष्ठित 'SKOCh' Award साठी निवड झाली आहे. ही संपूर्ण अकोला जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. या पुरस्कारामुळे अकोल्याच्या लौकिकात भर पडली आहे. आता हा लौकिक आणखी वाढवत अकोल्याला राष्ट्रीय स्तरावर गौरविण्यासाठी तुमच्या



सर्वांच्या एका मताची गरज असल्याचे मत जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केले आहे. हा प्रकल्प नागरिकांना भूमी संदर्भातील सेवा अधिक पारदर्शक, जलद आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात आला आहे. डिजिटल प्रशासनाच्या दिशेने अकोला जिल्ह्याने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा सूचना अधिकारी अनिल चिंचोले यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे ऋषिकेश आग्रे यांनी ई-भूमिती प्रणाली तयार केली आहे. आता या यशाला अधिक उंचीवर नेण्यासाठी आपल्या प्रत्येक मताची गरज आहे. आपण सर्वांनी https: // e&shibition.skoched .in/Beacon-of-hope/collector-officer-akola या लिंकवर जाऊन 'e-Bhoomitied Project – Collector Office Akola' ला आपले अमूल्य मत द्यावे. कारण आपले एक मत अकोला जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळवून देऊ शकते. विशेष म्हणजे आपले मत देताना २५ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी हा पर्याय निवडावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे करण्यात आले आहे.

### आता अकोला जिल्ह्यालाही पुरस्कार

महाराष्ट्रातील अनेक प्रकल्पांना प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कार मिळालेले आहेत. ज्यामध्ये 'शासन आपल्या दारी', 'उमेद मार्ट' आणि 'मिशन बाल भरारी'यांचा समावेश आहे. हे पुरस्कार डिजिटल गव्हर्नन्स, नागरी सेवा आणि ग्रामीण विकासातील उत्कृष्ट कार्यासाठी दिले जातात. आता या यादीत अकोल्याचा समावेश झाला असून, 'ई-भूमिती' या प्रकल्पाची प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

# जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य!

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**मुंबई:** राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून, आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती.


CLASSIFIED

प्लॉट प्लॉट प्लॉट

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606 7757905649

सिध्दार्थ वधू-वर सूचक केंद्र

मुला-मुलींचे तसेच घटस्फोटीत यांची नाव नोंदणी करण्यात येईल. याची फी ५०० रुपये राहील. (फक्त बौध्द समाजातील मुला-मुलींकरीता)

-:संपर्क:-

सिध्दार्थ दामोधरे अमरावती मो.9545000880

फ्लॅट फ्लॅट फ्लॅट

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250 8788432278


# राष्ट्रवादीत सुनेत्रा पर्वाला आता प्रारंभ!

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड; अधिवेशनात घोषणा

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यामुळे आता सुनेत्रा पवार पर्वाला प्रारंभ झाला असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांच्या नावाची घोषणा पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी केली. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्त्वात राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा भरारी येईल, असा विश्वास पटेल यांनी व्यक्त केला.

प्रफुल पटेल यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्व गुणांचे तोंड भरुन कौतुक केले. पक्ष आणि कार्यकर्त्यांसाठी अजितदादांच्या मनात तळमळ होती, अशा शब्दांत पटेल यांनी अजित पवारांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात बोलताना पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शपचे आमदार रोहित पवार यांच्यावर नाव न घेता टीका केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर तीन दिवसांनी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तेव्हापासूनच राष्ट्रवादी काँग्रेसचं राष्ट्रीय अध्यक्षपद कोणाकडे जाणार याबद्दलची चर्चा सुरु झाली. या चर्चेला आज पूर्णविराम मिळाला आहे. आता पक्षाची धुरादेखील त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे.



### सुनेत्रा पवार बारामतीच्या आमदार होणार?

दरम्यान, अजितदादांकडे असलेल्या दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आता सुनेत्रा पवार यांच्याकडे आल्या आहेत. यासह सुनेत्रा पवार या बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूकही लढवणार आहेत. तसे झाले तर ही निवडणूक बिनविरोध होईल, असा विश्वास खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे भविष्यात सुनेत्रा पवार या बारामतीच्या आमदार ठरण्याची शक्यता आहे. दुसरीकडे अजितदादा आणि सुनेत्रा पवार यांचे ज्येष्ठ चिरंजीव पार्थ पवार यांच्यावरही महत्त्वाची जबाबदारी दिली जाणार आहे. ते राज्यसभेत खासदार होणार आहेत. तशी घोषणा प्रफुल्ल पटेल यांनी केली आहे.

# वाहन परवान्याकरिता श्रेणीनिहाय पद्धत आणणार - नितीन गडकरी

वृत्तसंस्था २७ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** जबाबदारीने वाहन चालवण्यासह रस्ते अपघात रोखण्यासाठी सरकार श्रेणीआधारित लायसन्स पद्धत सुरू करणार आहे. वाहतुकीचे नियम वारंवार मोडल्यास लायसन्स रद्द करण्याची तरतूदही त्यात असेल, असे स्पष्ट संकेत केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी दिले.

भारतीय उद्योग महासंघाने (सीआयआय) आयोजित केलेल्या राष्ट्रीय रस्ते सुरक्षा परिषदेत नितीन गडकरी यांनी याबाबत माहिती दिली. दरवर्षी देशभरात रस्ते



अपघातांमध्ये सुमारे १ लाख ८० हजार जणांचा मृत्यू होतो. मोबाइलवर बोलत वाहन चालवणे, अतिवेग, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे आणि मद्यपान करून वाहन चालवणे अशी कारणे या अपघातांमागे आहेत, असे गडकरी यांनी सांगितले. लोकांचा जीव महत्त्वाचा आहे. रस्ते सुरक्षेसाठी सरकार विविध उपाययोजना करीत आहे. मात्र, नियमांची अंमलबजावणी हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे.

### ७२ टक्के अपघाती मृत्यू १८ ते ४५ वयोगटातील!

देशात दरवर्षी सुमारे पाच लाख रस्ते अपघात होतात आणि त्यात १ लाख ८० हजार जणांचा मृत्यू होतो. यातील ७२ टक्के मृत्यू हे १८ ते ४५ वयोगटातील व्यक्तींचे होतात. १८ वर्षांखालील १०,११९ व्यक्तींचा दरवर्षी मृत्यू होतो, तर हेल्मेट न वापरल्याने ५४,१२२ जणांनी प्राण गमावल्याचे गडकरी यांनी सांगितले. अपघातग्रस्तांसाठी 'पीएम राहत' योजनेनुसार प्रत्येक अपघातग्रस्त अपघातानंतरच्या सात दिवसांपर्यंत दीड लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचारास पात्र आहे.

# मुंबईत कॉलेजचे नाव गुजरातीत!

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**मुंबई :** कांदिवलीतील बालभारती मगनलाल जे पंचोलिया कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारावरील नामफलकावर गुजराती भाषेत नाव असल्याने एक नवीन वाद निर्माण झाला आहे. ही घटना 'हा महाराष्ट्र आहे की गुजरात?' असा प्रश्न उपस्थित करत आहे. ठाकरे गटाच्या युवासेनेने या प्रकरणी आक्रमक भूमिका घेतली असून, याला मराठी भाषेवरचे अतिक्रमण आणि अन्याय म्हटले आहे.


युवासेनेने प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, मराठी नावाऐवजी गुजराती नाव लावणे चुकीचे आहे आणि शासनाने यावर ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे. नामफलकावर मराठीचा म देखील नसून, गुजराती आणि इंग्रजीमध्येच नाव लिहिलेले आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही संस्थेचे फलक मराठीमध्येच असावेत असा नियम असतानाही, हे कॉलेज नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आहे.

# 'एआय' ने हिरावली 4 हजार कर्मचाऱ्यांची रोजीरोटी!

## अमेरिकन कंपनीचा धक्कादायक निर्णय

वृत्तसंस्था २७ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** एआय आता फक्त एक नवीन तंत्रज्ञानपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर आपल्या कामाच्या पद्धतीत बदल घडवून आणणारी शक्ती बनली आहे. नवीन तंत्रज्ञान हळूहळू मानवी नोकऱ्यांची जागा घेईल, अशी अनेकांना भीती वाटत असतानाच ट्विटरचे माजी सीईओ जॅक डोर्सी यांच्या फिनटेक कंपनी, ब्लॉक इंकने या दिशेने एक मोठे पाऊल उचलले असून ब्लॉक इंक, ज्याला पूर्वी स्क्वेअर म्हणून ओळखले जात होते, तिने सुमारे



४००० कर्मचाऱ्यांना घरी बसवण्याचा निर्णय घेतला आहे.

कंपनीने म्हटले की भविष्यात कामाचे विश्व पूर्णपणे बदलणार आहे. एआयचा वापर अनेक प्रक्रिया जलद, स्वस्त आणि अधिक प्रगत बनवेल परिणामी, कमी कर्मचाऱ्यांसह अधिक काम शक्य होऊ शकेल. कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय निश्चितच कठीण आहे, पण कंपनी याकडे भविष्याची तयारी म्हणून पाहत आहे. भविष्यात कामगार उत्पादकतेचा चेहरा पूर्णपणे बदलणार आहे आणि यामध्ये एआय मध्यवर्ती भूमिका बजावेल असे कंपनीचे म्हणणे आहे. जॅक डोर्सी पुढे म्हणतात की पाऊल भविष्यातील आव्हानांसाठी कंपनीला तयार करण्यासाठी आणि अधिक 'चपळ' बनवण्यासाठी एक धोरणात्मक गुंतवणूक असून टाळेबंदीच्या घोषणेनंतर ब्लॉकचे शेअर्सनी आफ्टर-मार्केट ट्रेडिंगमध्ये २७ टक्के उसळी घेतली.

### आयटी क्षेत्रासाठी धोक्याची घंटा?

तंत्रज्ञान किंवा आयटी उद्योग अद्याप स्थिरावलेला नाही. २०२४ आणि २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपातीनंतर ब्लॉकसारख्या कंपन्या २०२६ पासून एम्प्लॉईजना नारळ देत आहेत. अशा स्थितीत, आता कंपन्या केवळ वाढीवर नाही, तर नफा आणि कार्यक्षमतेवर लक्ष केंद्रित करेल हे स्पष्ट आहे. जॅक डोर्सी नेहमीच नाविन्यपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी ओळखले जातात व ब्लॉकमधील या अलीकडच्या हालचाली भविष्यात, तंत्रज्ञान कंपन्या कमी लोकांसह अधिक काम करण्यासाठी एआय आणि ऑटोमेशनचा वापरण्याचा प्रयत्न करेल असेच दर्शवते.






CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावती गुन्हे शाखेने पकडला जुगार, आरोपी ताब्यात

**अमरावती :** गुन्हे शाखेचे पथक पो स्टे फ्रेजरपुरा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना ईसम नामे पंकज ठाकरे रा.रवीनगर हा भूषण हिरुरकर रा.न्यू कॉलनी, मंगलधाम याचे राहते घरी जुगार भरवतो अशा माहितीवरून रेड केली असता तेथून एकूण ०९ आरोपी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून एकूण ५८५००/ञ् रोख रक्कम,७ मोबाईल कीमत अंदाजे १,१५,०००/ञ् रु, ०६ मोटारसायकल किंमत अंदाजे ४,२०,०००/ञ् रु तसेच ताश पत्ते कीमत अंदाजे २००/ञ् रु असा एकूण ५,९३,७००/ञ् रु चा मुद्देमाल ताब्यात घेऊन जप्त केला आहे. त्यांच्या विरुद्ध पो स्टे फ्रेजरपुरा येथे कलम ४,५ म. जु.का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे. भूषण बबनराव हिरुडकर वय ५७ वर्ष राहणार न्यू कॉलनी मंगलधाम अमरावती निलेश बाळासाहेब गाडे ४० वर्ष राहणार पुंडलिक बाबा नगर अमरावती ,गौरव शिवाजीराव ठाकूर वय २७ वर्ष राहणार आदिवासी होस्टेल जवळ पार्वती नगर अमरावती , राहुल अरुण भाखडे वय ३५ वर्ष राहणार बुधवारा, अमरावती, अनिकेत शरद राव खांडेकर वय ३१ वर्ष राहणार , फरार आरोपी पंकज ठाकरे राहणार रवी नगर अमरावती असे पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे.

# इर्विन, डफरीन व सुपर हॉस्पिटल येथील आरोग्य सुविधांसाठी बजेट मध्ये निधी द्या - आ. सुलभाताई खोडके

## अमरावतीच्या सीआयआयआयटी प्रकल्पाला ३५ कोटींच्या निधीसाठी आ. सुलभाताई खोडके यांची पुरवणी मागणी

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अमरावती :** राज्यविधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये आज गुरुवार २६ फेब्रुवारी रोजीच्या कामकाजादरम्यान वर्ष २०२६-२०२७च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करतांना अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी अमरावतीच्या आरोग्य सेवांचा विस्तार व बळकटीसाठी राज्याच्या बजेट मध्ये भरीव निधीची तरतूद करण्याची मागणी केली. त्याचबरोबर अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविदयालयात मंजूर झालेल्या सीआयआयआयटी प्रकल्पाला ३५



कोटींच्या निधीसाठी पुरवणी मागणी सुद्धा सभागृहातून करण्यात आली.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित पुरवणीत मागणीवर चर्चा करतांना आ. सुलभा खोडके यांनी सांगितले कि, अमरावती जिल्ह्यातील तंत्रशिक्षण व अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची तांत्रिक शिक्षण गुणवत्ता सुधारण्यास त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्या मार्फत अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात खाजगी सहभागातून ठसेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इक्यूबेशन अँड ट्रेनिंग (ण्घ्घ्छ्ञ) प्रकल्प अर्थात ठसीआयआयआयटीठच्या कौशल्यवर्धन केंद्रांची उभारणी करण्यास मागील वर्षी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांनी घोषणा करून मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या इमारत बांधकाम व प्रशिक्षण खर्चाला जवळपास २०० कोटी रुपये खर्च लागणार असून त्यापैकी १६५ कोटींचा खर्च टाटा टेक्नोलॉजी लिमिटेड आणि भागीदार कंपन्या करतील आणि १५ टक्के खर्च म्हणजेच ३५ कोटी इतका खर्च हा महाराष्ट्र शासनाद्वारे उचलण्यात येणार आहे. सदर प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित होण्याकरिता शासनाने ३५ कोटी रुपये मंजूर करण्यासाठी नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्याला मंजुरी देऊन मार्च २०२६ च्या बजेट मध्ये निधी देण्याची मागणी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी अधिवेशनात केली आहे. तसेच राज्यात टाटा समूहामार्फत ठसीआयआयआयटीठ केंद्र उभारणीमध्ये स्व. अजितदादा पवार यांचे महत्वाचे योगदान आहे.

# मराठी शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात 'एआयएसएफ'चा एल्गार; विद्यार्थ्यांसह पालकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अमरावती :** राज्यातील सुमारे १८ हजार शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ) आक्रमक झाले असून अमरावतीत जोरदार आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेल्या या मोर्चात विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मराठी शाळा वाचवण्यासाठी घोषणाबाजी करत आंदोलकांनी सरकारच्या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला.

राज्य शासनाने कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा




निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक गावांमध्ये जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महापालिकेच्या शाळा बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दूरवर जावे लागेल आणि शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण होईल, असे आंदोलकांचे म्हणणे आहे.

एआयएसएफच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या मोर्चात विद्यार्थ्यांनी हातात फलक घेत मराठी शाळा वाचवा, शिक्षण वाचवा अशा घोषणा दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. शासनाने तात्काळ हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

आंदोलनात विविध मान्यवरांनी आपली भूमिका स्पष्ट करत शिक्षण हक्काचे आहे, ते हिरावून घेऊ नये, अशी मागणी केली. मराठी शाळा टिकल्या तरच ग्रामीण भागातील मुलांचे भविष्य सुरक्षित राहील, असे मत व्यक्त करण्यात आले. एकूणच, मराठी शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे संतापाची लाट उसळली असून येत्या काळात हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

रजिस्ट्री सं. डी.एम.-33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी. डी.एल. अ.-16022026-270187
CG-DL-E- 16022026-270187
असाधारण
EXTRAORDINARY
भाग 11-खण्ड 3-उप-खण्ड (ii)
PART II Section 3-Sub- section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 761 ] नई दिल्ली, सोमवार, फरवरी 16, 2026/माघ, 1947
No. 761 ] NEW DELHI, MONDAY, FEBRUARY 16, 2026/ MAGHA 27, 1947

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय
## अधिसूचना

नई दिल्ली, 16 फरवरी, 2026

**का.आ. 799 ( अ ).-** केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसक पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३ क की उप-धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करने हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि **महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए के कि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) तक के भूखंड का निर्माण (बार्शीटाकळी बायपास चार लेन पेव्ड शोल्डर सहित का बनाने, आदि),** अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिम वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी मुर्तीजापुर को लिखित रूप में किया जायगा और उसमे उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यनितगत रूप में या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवसर देना और ऐसी आक्षेपो की सुनवाई के पश्चात तथा ऐसी और जाँच करने के पश्चात, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियो को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिसूचना की धारा ३ ग की उप- धारा के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

### अनुसूची

महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ ए के. कि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान- अकोला भाग) लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण.

| राज्य का नामः महाराष्ट्र | | | | जिले का नामः अकोला | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| तालुक का नाम : बार्शिटाकळी | | | | | |
| गांव का नाम : अश्कारीपुर | | | | | |
| 1 | 36/A/37/A/2 | निजी | अकृषक | 0.0086 (हेक्टेयर) | 0.0086 |
| 2 | 36/A/37/A/3 | निजी | अकृषक | 0.0096 (हेक्टेयर) | 0.0096 |
| 3 | 37 Paiki | निजी | कृषक | 0.1406 (हेक्टेयर) | 0.1406 |
| 4 | 37 Paiki | निजी | अकृषक | 0.0695 (हेक्टेयर) | 0.0695 |
| 5 | 37 Paiki | निजी | अकृषक | 0.0115 (हेक्टेयर) | 0.0115 |
| गांव का नाम : वनखेडपुर | | | | | |
| 6 | 10 | निजी | अकृषक | 0.02 (हेक्टेयर) | 0.02 |
| 7 | 10 | निजी | कृषक | 0.11 (हेक्टेयर) | 0.11 |
| 8 | 15 | सरकारी | अकृषक | 0.1 (हेक्टेयर) | 0.1 |
| 9 | 16 | सरकारी | अकृषक | 0.002815 (हेक्टेयर) | 0.002815 |
| 10 | 16 | निजी | कृषक | 0.0854 (हेक्टेयर) | 0.0854 |
| 11 | 16/1 | निजी | अकृषक | 0.015108 (हेक्टेयर) | 0.015108 |
| 12 | 16/2 | निजी | अकृषक | 0.01461 (हेक्टेयर) | 0.01461 |
| 13 | 16/3 | निजी | अकृषक | 0.014584 (हेक्टेयर) | 0.014584 |
| 14 | 16/4 | निजी | अकृषक | 0.014777 (हेक्टेयर) | 0.014559 |
| 15 | 16/5 | निजी | अकृषक | 0.014524 (हेक्टेयर) | 0.014524 |
| 16 | 16/6 | निजी | अकृषक | 0.014464 (हेक्टेयर) | 0.014464 |
| 17 | 16/7 | निजी | अकृषक | 0.014319 (हेक्टेयर) | 0.014319 |
| 18 | 16/8 | निजी | अकृषक | 0.014319 (हेक्टेयर) | 0.014319 |
| | | | | Total | 0.674502 |

[फा. स. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A]
शेख अमीनखान, निदेशक

# MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS
# NOTIFICATION

New Delhi, the 16th February, 2026

**S.O. 799(E).** - In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for Building **(Barshitakli Bypass Four Lane with paved shoulder) maintenance, management and operation of National Highway No. 161A at Barshitakli in the stretch of land from Km 0/00 to Km 3/100 (Mahan-Akola Section) in the district of Akola in the state of Maharashtra,** hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, **Sub Divisional Officer Murtizapur,** in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

### SCHEDULE

Brief description of the land to be acquired, with or without structure falling NH 161A within the stretch of the land from Km 0/00 to Km 3/100 (Mahan-Akola Section) in the district of Akola in the state of Maharashtra.

| State: MAHARASHTRA | | | District: AKOLA | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| Taluka: Barshitakli | | | | | |
| Village: Ashkaripur | | | | | |
| 1 | 36/A/37/A/2 | Private | Non-Agriculture | 0.0086 (hectare) | 0.0086 |
| 2 | 36/A/37/A/3 | Private | Non-Agriculture | 0.0096 (hectare) | 0.0096 |
| 3 | 37 Paiki | Private | Agriculture | 0.1406 (hectare) | 0.1406 |
| 4 | 37 Paiki | Private | Non-Agriculture | 0.0695 (hectare) | 0.0695 |
| 5 | 37 Paiki | Private | Non-Agriculture | 0.0115 (hectare) | 0.0115 |
| Village: Wankhedpur | | | | | |
| 6 | 10 | Private | Non-Agriculture | 0.02 (hectare) | 0.02 |
| 7 | 10 | Private | Agriculture | 0.11 (hectare) | 0.11 |
| 8 | 15 | Government | Non-Agriculture | 0.1 (hectare) | 0.1 |
| 9 | 16 | Government | Non-Agriculture | 0.002815 (hectare) | 0.002815 |
| 10 | 16 | Private | Agriculture | 0.0854 (hectare) | 0.0854 |
| 11 | 16/1 | Private | Non-Agriculture | 0.015108 (hectare) | 0.015108 |
| 12 | 16/2 | Private | Non-Agriculture | 0.01461 (hectare) | 0.01461 |
| 13 | 16/3 | Private | Non-Agriculture | 0.014584 (hectare) | 0.014584 |
| 14 | 16/4 | Private | Non-Agriculture | 0.014777 (hectare) | 0.014559 |
| 15 | 16/5 | Private | Non-Agriculture | 0.014524 (hectare) | 0.014524 |
| 16 | 16/6 | Private | Non-Agriculture | 0.014464 (hectare) | 0.014464 |
| 17 | 16/7 | Private | Non-Agriculture | 0.014319 (hectare) | 0.014319 |
| 18 | 16/8 | Private | Non-Agriculture | 0.014319 (hectare) | 0.014319 |
| | | | | Total | 0.674502 |

जा.क्र./जिमाका/ अकोला/ जाहिरात/ 164/2026

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A]
SAIKH AMINKHAN, Director

# सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे धडे

**हिवरखेड:** येथील सरस्वती प्राथमिक विद्यामंदिराच्या शाळेतील परिसरामध्ये २६ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात 'बाल आनंद मेळावा' झाला. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने विविध स्टॉल उभारून कार्यक्रमाची शोभा वाढवली. पालकवर्गानेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारज्ञान, नफा–तोटा, फायदा–नुकसान, दुकानाची मांडणी, गुणवत्ता–प्रमाण (क्वालिटी–क्वांटिटी) तसेच व्यवस्थितपणा यांसारखे गुण विकसित करणे हा होता. शालेय जीवनातच व्यावहारिक कौशल्यांची जाणीव व्हावी यासाठी शाळेमार्फत हा उपक्रम राबविण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक अमोल भोंगाळे यांच्या हस्ते सरस्वती मातेचे पूजन करून करण्यात आले. या प्रसंगी राऊत मॅडम, धर्माळे, सोळंके, कवळकार, खेट्टे, कौलकार, धारपावर तसेच संस्थेचे संचालक .अरुण कवळकार व गावातील पत्रकार अर्जुन खिरोडकार, गणेश सुरजोसे,व पालकवर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## त्रिकालामध्ये राहील असे सत्कर्म जीवनामध्ये करा - देवी वैभवीश्रीजी



**केळीवेळी :** स्व. मधुकरराव बुले यांच्या ५ व्या पुण्यस्मणानिमित्त श्रीमद् भागवत कथा व गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन दि. २६ फेब्रुवारी ते ५ मार्च पर्यंत करण्यात आले आहे. यामध्ये दररोज सकाळी ५ ते ६ काकडा, सकाळी ९ ते १२ व दुपारी २.३० ते ४.५० पर्यंत श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज नावकार यांच्या वाणीतून गाथा पारायण, संध्या. ५.३० ते ६.३० पर्यंत हरिपाठ व संध्या ७ ते १०.३० श्री क्षेत्र वृंदावन येथील कथा प्रवक्त्या देवी वैभवीश्रीजी यांच्या सुमधूर वाणीतून श्रीमद्? भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या भागवत कथेचे पहिले गुष्प गुंफतांना देवी वैभवीश्रीजी यांनी सांगितले की, भगवत भक्तांची कथा म्हणजेच भागवत. अज्ञान हे दु:खाचे मुळ कारण आहे हे उदाहरणासहित भजनातून समजावून सांगितले. वर्तमान काळ, भुतकाळ व भविष्यकाळ यावर बोलतांना दीदी म्हणाल्या की, ज्या मुलांवर सुसंस्कार असेल ते मुल तुम्हा आई वडीलांचे ऐकत असेल ते मुल रघुनंदनासारखे होईल, छोट्याश्या वयात ज्या मुलांच्या जीभेवर ज्ञानेश्वरी असेल तो मुलगा आई वडीलांना देवासमान मानतो.

## सदभावच्या संवाद बैठकीत अनेक मुद्यावर चर्चा

**अकोला:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अकोलाच्या वतीने स्थानिक रामदासपेठ मधील श्रीदत्त मंदिरात सद्भाव बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.वारकरी संप्रदायाचा कळस ठरलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ' हभप अनिकेत महाराज मोरे, देहू यांची या बैठकीसाठी विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी झालेल्या चर्चेत सामाजिक कार्यासोबत धर्म कार्याची आवश्यकता महाराजांनी छोट्या छोट्या उदाहरणातून समजावून सांगितली.यामध्ये शैक्षणिक साहित्या सोबत धार्मिक साहित्य वितरणाची आवश्यकता, गावागावात मंदिरात प्रभात समयी आरती , सायंकाळी हरिपाठाचे पठण,मंदिर केंद्रित गाववस्ती निर्माण होणे ही काळाची आवश्यकता असल्याचे यावेळी सांगितले.

## उबाठा शिवसेनेच्या वतीने दहीहांडा फाटा येथे विविध मागण्या संदर्भात रस्ता रोको




प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**चोहोट्टा:** रोजी सकाळी उबाठा शिवसेनेच्या वतिने अमेरिकेसोबत शेतकरी विरोधी केलेले करार रद्द करावे व महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेले पिकविमाचे हेक्टरी १७००० हजार शेतकर्यांना तत्काळ देण्यात यावे या मागणी करीता दहीहांडा फाटा येथे उबाठा शिवसेनेच्या वतिने रास्त रोखो आंदोलन करण्यात आले.यावेळी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तर या रस्ता रोखो आंदोलनामुळे अकोट अकोला रोडवरील वाहतुक विस्कळीत झाली होती.

## अमेरिका कराराविरोधात शिवसेनेचा रस्ता रोको; विविध ठिकाणी आंदोलन

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी



**अकोट:** केंद्र सरकारने अमेरिकेसोबत केलेला कथित शेतकरीविरोधी करार रद्द करावा, या मागणीसाठी शिवसेना अकोट तालुक्याच्या वतीने आज विविध ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

मोहाळा फाटा, सावरा, आसेगाव फाटा, उमरा फाटा तसेच देवरी फाटा येथे शिवसैनिकांनी रास्ता रोको करत केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविला. या करारामुळे देशातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असून शेतीमालाच्या दरांवर विपरीत परिणाम होईल, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

आंदोलनादरम्यान काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. प्रशासनाने घटनास्थळी भेट देत परिस्थिती नियंत्रणात आणली. केंद्र सरकारने तात्काळ हा करार रद्द करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

या प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, तालुका प्रमुख ब्रम्हा पांडे, शहर प्रमुख मनोज खंडारे, जगन निचळ, सुहासिनी वाघोडे, गोपाल सपकाळ, पांडुरंग तायडे, सुभाष सुरत्ने, अक्षय वाघोडे, राहुल पाचडे, विजय जवंजाळ, प्रभूदास मेंढे, सूरज गनभोज, अविनाश गावंडे, विजय चौहान, विजय ढेपे, नंदू कुलट, मंगेश चौधरी, गणेश आढाउ, योगेश सपकाळ, अक्षय जवंजाळ, अनिल ढोबळे, भूषण जवंजाळ, शुभम ढोबळे, योगेश तलोकार, शत्रू सावरकर, बाबाराव तायडे आदींसह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समर्थ स्कूलमध्ये पर्यावरणपूरक रंगांची कार्यशाळा संपन्न

**अकोला:** रिधोरा येथील श्री समर्थ पब्लिक स्कूलच्या वतीने पर्यावरण पूरक रंग कार्यशाळा आयोजित केली होती.या कार्यशाळेमध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. कीर्ती देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



त्यांनी पर्यावरण पूरक रंग कसे बनवावेत, त्यासाठी कोणत्या पद्धती वापराव्यात,कोणते रंग वापरावेत,ते वापरताना,ते बनवताना काय काळजी घ्यावी, हात स्वच्छ धुताना काय काळजी घ्यावी या सर्व गोष्टीची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

होळी आणि रंगपंचमी यांच्या आगमनानिमित्त या रंग कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक शाळेमध्ये करण्याचा त्यांचा मानस असल्याने त्यांनी श्री समर्थ पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना दिलेले हे ज्ञान निश्चितच विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांनाही उपयुक्त असेच असल्याचे गौरवोद्गार श्री समर्थ पब्लिक स्कूल, रिधोरा चे उपप्राचार्य प्रेमेंद्र पळसपगार यांनी काढले.

या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये कला विभागाचे विभाग प्रमुख गणेश सांगळे यांनी व ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांनीही परिश्रम घेतले. या कार्यशाळेत उपस्थित शिक्षकांनी सुद्धा सहभाग घेऊन या रंग कार्यशाळेत वेगळाच उत्साह निर्माण केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. दीपाली बेंडे यांनी तर आभार प्रदर्शन सौम्या राठोड यांनी केले.

## बाळापूरला शिवसेना उबाठाचे आंदोलन



प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**बाळापूर:** शिवसेना उपनेते तथा आमदार नितीन देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, मंगेश काळे यांच्या आदेशाने, केंद्र सरकारने अमेरिकेसोबत केलेल्या शेतकरी विरोधी करार रद्द करण्यासाठी व महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेले पीक विम्याचे हेक्टरी १७ हजार रुपये शेतकऱ्यांना तात्काळ मिळण्यासाठी गुरूवारी पारस फाटा येथे शिवसेनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

यावेळी बाळापुर तालुक्यातील शेतकरी तसेच शिवसेना व युवा सेनेचे आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमरा सह परिसरातील वन्य प्राण्यांचा बंदोबस्त न झाल्यास प्रशासनाला आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी



> उमरा परिसरातील वन्यप्राण्यांच्या होणारे हल्ले शेतकरी व विद्यार्थी सह ग्रामस्थांचे जीवन जगणे खूपच कठीण झाले आहे त्यामुळे तात्काळ उपाययोजना न झाल्यास मी प्रशासनाला आमरण उपोषणाचा इशारा निवेदन दिले आहे.
>
> **राम मंगळे**
> बेलुरा सरपंच

**अकोट:** उमरा सह शहापूर, जीतापूर, शिवपुर, कासोद, जीतापूर माऊली, बोर्डी, पिंपरी जैनपुर, पिंपरी खुर्द, चोरड बेलुरा या सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेला संपूर्ण आदिवासी पट्टा पट्ट्यामधील गेल्या कित्येक वर्षापासून वन्यप्राणी बिबट वाघ अस्वल माकडाच्या होणाऱ्या हल्ल्यामध्ये कितीतरी आदिवासी शेतमजूर शालेय विद्यार्थी मोठ्या प्रमाणात हल्ल्यामध्ये जीवाला मुकावे लागले तर काही काहींना संपूर्ण जीवनाचे अपंगत्व झाले यावर आज पर्यंत वन विभागाकडून कोणतीच ठोस उपाययोजना करण्यात आली नसून वन विभागाच्या ना कर्त्यापनाला आदिवासी रोष व्यक्त करीत अखेर वन विभाग व अकोला जिल्हाधिकारी कार्यालयावर बेलुरा गावचे सरपंच प्रीतीताई राम मंगळे व लक्ष्मीकांत कौटकर यांना अखेर धाव घ्यावी लागली, दि.१४ बोर्डी येथील शेतकरी भर दिवसात शेतात काम करीत असताना निलेश शांताराम मोहल्ले यांच्यावर बिबटाने हल्ला केला, दि.१९ सकाळी सुमारे १० वाजता शाळेत जात असताना एका १२ वर्षीय कौस्तुभ गणेश ताडे विद्यार्थ्यांवर बिबट्याने हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यात संबंधित विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून त्याच्या पाठीवर व हातावर चाव्याच्या जखमा झाल्या आहेत. जखमी विद्यार्थ्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले आहेत. घटनेनंतर परिसरातील नागरिक व पालक वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या काही दिवसांपासून उमरा व आजूबाजूच्या शेतशिवारात माकडांचा मुक्त संचार सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. शेतकऱ्यांना शेतात जाणे धोकादायक बनले असून महिला, लहान मुले व वृद्धांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, अकोट (महाराष्ट्र वनविभाग) यांना लेखी निवेदन देऊन संबंधित माकडाला तातडीने पकडण्याची संपूर्ण बंदोबस्त करा मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.


### नगर परिषद कार्यालय, घाटंजी जि. यवतमाळ
### निविदा सूचना

घाटंजी नगर परिषद मार्फत न.प. निधी अंतर्गत नगर परिषद मार्फत "जागतिक महिला दिन" या कार्यक्रमाचे नियोजनबाबत कामे करणे या कामाकरिता सीलबंद दरमागणी द्विलीफाफा पद्धतीने इच्छुक पुरवठा धारक/ दुकानदार यांचेकडून दि. २७/०२/२०२६ पासून दि. ०५/०३/२०२६ ला दुपारी १२ पर्यंत निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना तसेच अटी व शर्ती कार्यालयामध्ये पाहण्यास उपलब्ध आहे. निविदा प्रपत्र शुल्क रू. ५००/- व रु. १०००/- अनामत रक्कम रोखपाल नगर परिषद घाटंजी यांच्याकडे नगदीने भरणा करावे. निविदा दि. ०५/०३/२०२६ ला दुपारी ०५ वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

| नगराध्यक्ष | उपनगराध्यक्षा | महिला व बालकल्याण सभापती | मुख्याधिकारी |
|---|---|---|---|
| नगर परिषद घाटंजी | नगर परिषद घाटंजी | नगर परिषद घाटंजी | नगर परिषद घाटंजी |

नगर परिषद कार्यालय, घाटंजी जा.क्र. नपघा/४२६८/२०२६ दि. २७/०२/२०२६



**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर**
**प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला**
**पत्ता - नेहरु पार्क चौक, मुर्तीजापूर रोड, प्रकाश टि.व्हि. एस. शोरुम समोर, अकोला ४४४ ००१**

ई-मेल पत्ता:- eemilsdnakola@rediffmail.com दुरध्वनी / फॅक्स क्रमांक ०७२४ २४१५५६०

**ई-निविदा सुचना क्र.ब-१/२०/ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोडींगकरीता दि.२७/०२/२०२६ (११:०० वा.) पासून उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी वरील संकेतस्थळाला भेट द्यावी. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळवण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत(रुपये) |
|---|---|---|
| १ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. चांगेफळ** ता. जि. अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | १,६४,१४,७५५/- |
| २ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. सोनाळा** ता. जि. अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | ९८,४८,९३८/- |
| ३ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. बोरगाव** मंजु ता. जि. अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | ९८,४८,३३१/- |
| ४ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. वसाळी नागापुर** ता. अकोट जि. अकोला येथील कोल्हापुर पध्दत बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | १,३२,१८,३६०/- |
| ५ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. जाफ्रापुर** ता. तेल्हारा जि. अकोला येथील व्दारयुक्त साठवण बंधारा क्र.३ चे बांधकाम करणे | १,१६,१४,१२६/- |
| ६ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. चोंढी** ता. पातुर जि. अकोला येथील व्दारयुक्त साठवण बंधारा क्र.२ चे बांधकाम करणे | १,२०,७५,९३७/- |
| ७ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. जिरायत** पातुर भाग-३ ता. पातुर जि. अकोला येथील कोल्हापुर पध्दत बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | ८६,०३,८४१/- |
| ८ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. बटवाडी बु.** ता. बाळापूर जि. अकोला येथील सिमेंट नाला बंधारा क्र. ३ चे बांधकाम करणे | ४४,०३,६१०/- |
| ९ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. बटवाडी खु.** ता. बाळापूर जि. अकोला येथील सिमेंट नाला बंधारा क्र.४ चे बांधकाम करणे | ३५,०८,८८६/- |
| १० | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. डोलारखेड** ता. पातुर जि. अकोला येथील सिमेंट नाला बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | २८,२२,६५१/- |
| ११ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. पाराभवानी** ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथील व्दारयुक्त साठवण बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | ३२,४८,१३८/- |
| १२ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ. सोनोरी** ता. मुर्तीजापूर जि. अकोला येथील सिमेंट नाला बंधारा क्र.२ चे बांधकाम करणे | २४,१८,५४५/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २७/०२/२०२६ (११.००) वा. ते ०६/०३/२०२६ (१८.००)
ई-निविदा उघडणे :- दिनांक ०९/०३/२०२६ (११.००)
खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ - :http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला कार्यालयातील सुचना फलकावर पाहावयास मिळेल.

(अ. दि. मस्कर)
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग, अकोला.

जा.क्र.४६७/ई-नि.सु.२०/२०२५-२६/२०२६ दिनांक २३/०२/२०२६
जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग अकोला,
नेहरु पार्कजवळ, मुर्तिजापूर रोड, अकोला


## मोर्णा नदी पात्रातील जलपर्णी काढा, नगरसेवक नितीन ताकवाले यांचे महापौरांना निवेदन

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी



**अकोला :** शहरातून वाहणाऱ्या मोर्णा नदीच्या पात्रात जलपर्णी मोठ्या प्रमाणात वाढल्याने नदीचे स्वरूप विद्रूप झाले असून पाण्याचा प्रवाहही ठप्प झाला आहे. परिणामी परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने मोर्णा नदीतील जलपर्णी तातडीने काढून संपूर्ण पात्राची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक १० चे नगरसेवक नितीन ताकवाले यांनी महापौर शारदाताई खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, विजय अग्रवाल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मोर्णा नदीच्या पात्रात सध्या मोठ्या प्रमाणात जलपर्णी पसरली आहे. त्यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडथळित झाला असून पाणी साचून राहात आहे. साचलेल्या पाण्यामुळे अस्वच्छता वाढून डासांची उत्पत्ती झपाट्याने होत आहे. याचा परिणाम म्हणून प्रभागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरसेवक ताकवाले यांनी मनपा प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन यंत्रसामग्रीच्या माध्यमातून जलपर्णी काढण्याची मोहीम राबवावी, तसेच नियमित स्वच्छता आणि फवारणी करावी, अशी मागणी केली आहे.

## मदरशांबाबत मंत्री नितेश राणे यांच्या वक्तव्यावर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अकोला:** राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकारिया यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देत मंत्री नितेश राणे यांनी मदरशांबाबत केलेल्या आक्षेपार्ह व विभाजनकारी वक्तव्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.



निवेदनात जावेद जकारिया यांनी नमूद केले की, मंत्री नितेश राणे यांनी अलीकडे ङ्गमदरसे आतंकवादी तयार करण्याचे अड्डे आहेत, त्यांचा शिक्षणाशी काहीही संबंध नाहीङ्ग असे वक्तव्य केले. हे विधान अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून संबंधित मंत्री वारंवार अशा प्रकारची विधाने करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या वक्तव्यांमुळे एका विशिष्ट समाजाच्या भावना दुखावल्या जात असून राज्यात अविश्वासाचे वातावरण निर्माण होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## कर्मवीर गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**बाळापूर:** येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये सोमवारी संध्याकाळी परीट धोबी समाज व सामाजिक कार्यकर्ते यांच्या संयोगाने निष्ट निष्काम कर्मयोगी संत गाडगे महाराज यांची १५० वी जयंती गाडगे महाराजांच्या तैलचित्राचे व मूर्तीचे पूजन करून फटाके फोडून मिठाईवाटून उत्साहात साजरी झाली. या प्रसंगी बाळापुर शहरातील सामाजिक कार्यकर्ते शामरावजी शेलार हे अध्यक्षस्थानी होते गावातील विविध क्षेत्रातील सामाजिक राजकीय कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. याप्रसंगी गाडगे महाराजांच्या जीवनकार्यावर प्रेरणादायी शब्दसमनांनी आदरांजली व साष्टांग अभिवादन करण्यात आले. गणेश कापसे, उमेश आप्पाजी भुसारी, जयराम भाऊ सोनवणे, रमेश भाऊ लोहकरे, बाबूजी शर्मा, सुनील भाऊ वानखडे, रवी वखरे या वक्त्यांनी संत गाडगे महाराजांच्या जीवनकार्यावर व प्रेरणादायी प्रसंगावर आपले विचार भाषणातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक हिराळकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बंटी भाऊ किल्लेकर श्यामा किल्लेकर शुभम जामोदे राजेभाऊ हिराळकर शिंदे भाऊ रोशन किल्लेकर उमेश भाऊ जामोदे जगदीश जामोदे दत्ता किल्लेकर आकाश हिरळकर यांच्यासह समस्त परळी धोबी बांधवानी संत गाडगेबाबांची जयंती उत्साहात साजरी केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# यवतमाळ नगरपरिषदेचा 317 कोटींचा अर्थसंकल्प सादर



प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषदने २०२६-२७ आर्थिक वर्षासाठी एकूण ३१७ कोटी ३७ लाख ७४ हजार १५६ रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात शहराच्या पायाभूत सुविधा, रहिवासी सुविधा, सामाजिक कल्याण, पर्यावरण, सुरक्षा आणि सांस्कृतिक विकासासाठी निधी राखीव आहे. नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी सत्रात हा अर्थसंकल्प मांडला. यावेळी उपाध्यक्ष दत्ता कुळकर्णी, विषय समितीचे सभापती, नगरसेवक आणि मुख्याधिकारी शुभम क्यातमवार उपस्थित होते.

नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके म्हणाल्या, "हा अर्थसंकल्प फक्त उत्पन्न-खर्चाचा ताळेबंद नाही; यवतमाळकरांना आधुनिक, स्वच्छ आणि सोयीस्कर शहर देण्याचा आमचा संकल्प यात प्रतिबिंबित आहे."

**अर्थसंकल्पाची तपशीलवार माहिती : एकूण जमा** : ३१७ कोटी ३७ लाख ७४ हजार १५६ रुपये, एकूण खर्च: ३१४ कोटी ५ लाख ७० हजार रुपये, शिल्लक: ३ कोटी ३२ लाख ४ हजार १५६ रुपये आहे. नगरपरिषदने स्पष्ट केले की या आर्थिक वर्षात कोणतीही करवाढ करण्यात आलेली नाही. मालमत्ता हस्तांतरणावर आकारले जाणारे १% शुल्क रद्द केल्याने उत्पन्नात होणारी तूट भरून काढण्यासाठी आणि अतिरिक्त उत्पन्न वाढविण्यासाठी उपाययोजना आखल्या आहेत.

पायाभूत सुविधेसाठी रस्ते बांधकाम व दुरुस्ती २ कोटी, नाल्यांचे बांधकाम व दुरुस्ती: ४ कोटी, प्रमुख नाले साफसफाई: ३ कोटी, झोपडपट्टी भागात मुरूम व ह्युम पाईप: ७० लाख, सुलभ शौचालय बांधकाम: ३० लाख, स्वच्छता व आरोग्य: घनकचरा व्यवस्थापन: ५ कोटी नाल्या, एसटीपीएस व डब्ल्यूएम व्यवस्थापन: १ कोटी ७० लाख, नवीन दफनभूमी बांधकाम व देखभाल: १५ लाख, मुस्लिम व हिंदू स्मशानभूमी सौंदर्याकरण: २५ लाख, शाळा सुधार अभियान व स्वच्छ शाळा पुरस्कार: १ कोटी ७ लाख रुपयाची तरतुद केली आहे.

**पाणीपुरवठा आणि ऊर्जा–बोअरवेल दुरुस्ती** : १ कोटी २० लाख, विहीर दुरुस्ती व निगा: ५० लाख,सबमर्सिबल पंप लाईन दुरुस्ती: ५० लाख, सौर ऊर्जा प्रकल्प स्थापनेसाठी: १ कोटी, आवास व सामाजिक कल्याण:रमाई आवास योजना: ७ कोटी,नगरोत्थान विकासकामे: ७ कोटी, लो. अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना: १० कोटी, पंतप्रधान आवास योजना: ५ कोटी ५० लाख, अल्पसंख्यांक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक विकास: ३४ लाख, नागरी दलितेतर सुधार योजना: ६ कोटी, सांस्कृतिक, शैक्षणिक व पर्यावरणीय विकास: नाट्यगृह बांधकाम: ४ कोटी, संग्रहालय व पुतळा परिसर विकास: ६५ लाख, आझाद मैदान सौंदर्याकरण: २ कोटी, वृक्षारोपण व हरित पट्टा तयार करणे: ७२ लाख सुरक्षा व आपत्कालीन उपाययोजना: अग्निसुरक्षा वाहन खरेदी: २५ लाख मिनी फायर गाडी: १० लाख एम.आर.एफ. सेंटर उभारणी: ३ कोटी गणपती/दुर्गादेवी विसर्जन परिसर सुविधा: २५ लाख तरतुद केली आहे.

नगराध्यक्षांनी सांगितले की शंभर दिवसांचा कृती आराखडा राबविला जाईल, ज्यामध्ये पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय सुधारणांचा समावेश असेल.

नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके म्हणाल्या, "या अर्थसंकल्पातून यवतमाळ शहरात शाश्वत विकास आणि नागरिक-केंद्रित सेवा राबवण्याचा आमचा निर्धार दृढ राहील."

# झरी जामणी नगरपंचायतीत शिवसेना-भाजपा युतीचे वर्चस्व

## विषय समित्यांच्या सभापती एकमताने निवडले

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**योगेश मडावी**

**झरी जामणी** : झरी जामणी नगरपंचायतीतील विषय समित्यांच्या सभापतीपदी शिवसेना-भाजपा युतीने आपले वर्चस्व ठळकपणे सिद्ध केले आहे. यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, सलीम खेतानी, पराग पिंगळे, हरिहर लिंगनवार, आतिश चव्हाण तसेच पांढरकवडा उपनगराध्यक्ष किरण विश्वास नांदेकर आणि प्रफुल जिद्देवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड पार पडली.



वणी विधानसभा समन्वयक चंद्रकांत घुगुल आणि गटनेते दिनेश जयस्वाल यांच्या नेतृत्वात झालेल्या बैठकीत बांधकाम सभापती : सुनिताताई नकाते, आरोग्य सभापती : दिनेश जयस्वाल, पाणीपुरवठा सभापती : ज्ञानेश्वर कोडापे, बालकल्याण सभापती : रजनीताई नैताम यांची निवड करण्यात आली. नगराध्यक्ष शीला चौधरी, संतोष मंचलवार, सीमा मंडाळे, अनिल आत्राम, श्रीराम मेश्राम, सोनाली सोयाम, प्रभाकर किनाके यांसह सर्व नगरसेवक सभेला उपस्थित होते. संपूर्ण प्रक्रियेसाठी जिल्हा सचिव युवा सेना निलेश बेलेकर, चेतन बाशेट्टीवार, राहुल राजूरकर, रवी नकाते, मारुती मिलमिले व इतर शिवसैनिकांनी सक्रिय सहभाग घेतला. नगरपंचायतीतील ही एकमताची निवड विकासकामांना गती देईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे, तर युतीतील सर्व कार्यकर्त्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# बसमधून महिलेचे दोन तोळे सोन्याचे दागिने लंपास

## दोन तासात चोरीचा पर्दाफाश, दोन महिला जेरबंद

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**उमरखेड** : पोफाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीचा गुन्हा अवघ्या दोन तासांत उघड करत पोलिसांनी २ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन महिलांना ताब्यात घेण्यात आले आहे.



पुसद ते शेगाव प्रवास करत असलेल्या सविता शालिग्राम गडवे (वय ५०, रा. सुभाष वार्ड, पुसद) यांच्या बॅगमधून दोन तोळे वजनाचे सोन्याचे दागिने गायब झाले. पोफाळी कारखान्याजवळील बस स्टॉपवर उतरल्यावर त्यांनी बॅग तपासली असता दागिने नसल्याचे लक्षात आले. ताबडतोब त्यांनी पोफाळी पोलीस स्टेशनला माहिती दिली. पोलीस ठाणेदार निलेश शेंबडे आणि पोलिस अंमलदार शिवाजी पवार यांनी बसचा पाठलाग सुरू केला. त्याच वेळी बेलखेड फाट्याजवळ पेट्रोलिंग करत असलेल्या उमरखेड वाहतूक उपशाखेचे उपनिरीक्षक अमोल गुंडे, पोलिस अंमलदार शिवाजी चंद्रवंशी आणि नागेश वास्टर यांनी बस थांबवून तपासणी केली. तपासणीत दोन संशयित महिलांपासून दागिने हस्तगत करण्यात आले. दोन्ही महिलांना पुढील चौकशीसाठी पोलीस स्टेशन पोफाळीत ताब्यात घेतले. दागिने सुरक्षित परत मिळाल्याने सविता गडवे यांचा मोठा दिलासा झाला. पोफाळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार निलेश शेंबडे, कर्मचारी तसेच उमरखेड वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक अमोल गुंडे आणि त्यांचे सहकारी यांच्या तत्परतेमुळे चोरी गेलेले तीन लाख किमतीचे सोन्याचे दागिने परत मिळाले, यामुळे स्थानिक स्तरावर त्यांचे कौतुक होत आहे.

# सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**यवतमाळ** : लोकांच्या तक्रारी निकाली काढण्याच्यादृष्टीने मार्च महिन्याच्या पहिल्या सोमवारी दि. 2 मार्च 2026 रोजी सकाळी 10 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल प्रकरणे, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे असे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. तक्रार, निवेदन वैयक्तकि स्वरुपाची नसावी.

महिन्यातील तिसऱ्या सोमवारी तालुका स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये अर्जाचे निराकरण न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज सादर करावा. तसेच अर्ज दाखल करतेवेळी तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केल्याची पोच जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये सादर करावी. याशिवाय संबंधित अर्ज स्विकारले जाणार नाही, यांची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुध्द बक्षी यांनी केले आहे.

# साहित्यिक जाण आणि राजकीय भान जपणारे प्रा. डॉ. हेमंत देशमुख

काही व्यक्तिमत्वे केवळ पदांमुळे मोठी होत नाहीत; तर त्यांच्या विचारांमुळे, कार्यशैलीमुळे आणि समाजाशी असलेल्या बांधिलकीमुळे उंचावतात. प्रा. डॉ. हेमंत देशमुख हे असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. मराठी भाषा दिनाच्या पावन दिवशी जन्माला आलेल्या या व्यक्तिमत्वाने विज्ञान, साहित्य आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांत आपली स्वतंत्र छाप निर्माण केली आहे.

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात संगणक विभागप्रमुख म्हणून कार्य करताना त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या नव्या वाटा दाखवल्या. विज्ञानातील प्रगती आणि बदलते तंत्रज्ञान यांचा वेध घेत विद्यार्थ्यांना भविष्याभिमुख शिक्षण देण्यावर त्यांनी भर दिला. त्यांचे लेखन आणि व्याख्याने केवळ माहितीपर नसून प्रेरणादायी ठरले आहेत.



विज्ञानाशी नाळ जुळलेली असतानाही मराठी भाषा आणि साहित्याबद्दलची त्यांची आस्था तितकीच प्रगल्भ आहे. कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या विचारधारेप्रमाणे जिद्द, स्वाभिमान आणि 'कणा' टिकवण्याची शिकवण त्यांच्या व्यक्तिमत्वातून प्रत्ययास येते. भाषणातील मुद्देसूदपणा, स्पष्ट भूमिका आणि प्रभावी शब्दफेक यामुळे ते साहित्यिक जाण असलेले वक्ते म्हणूनही परिचित आहेत.

राजकीय क्षेत्रात ते अमरावती शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) या जबाबदारीवर कार्यरत आहेत. सार्वजनिक जीवनात पारदर्शकता, वेळेचे नियोजन आणि प्रामाणिकपणा यांवर त्यांचा कटाक्ष असतो. युवकांना सकारात्मक राजकीय सहभागासाठी प्रेरित करण्याचे काम ते सातत्याने करत आहेत.

क्रीडा क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग उल्लेखनीय आहे. नागपूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन मध्ये सचिव म्हणून सलग १४ वर्षे काम करत त्यांनी संघटन कौशल्य सिद्ध केले. विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

साधी राहणी, उच्च विचार आणि 'काम हीच पूजा' हा जीवनमंत्र यामुळे प्रा. डॉ. देशमुख हे साहित्यिक संवेदनशीलता आणि राजकीय जबाबदारी यांचा समतोल साधणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या दीर्घायुष्याच्या आणि निरंतर समाजकार्यासाठी ऊर्जा लाभावी ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**प्रा. रत्नाकर शिरसाट**
लातूर

# रेस्टॉरंटमध्ये चहा पिणे पडले लाखात; बॅग लंपास, गुन्हा दाखल

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**खामगाव** : नांदुरा शहरातील जुन्या बस स्टॅण्ड परिसरातील एका रेस्टॉरंट मध्ये चहा पिण्यासाठी आलेल्या ग्राहकाची लेदर बॅग अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना बुधवारी (दि. २५) दुपारी सुमारे दीड वाजेच्या सुमारास घडली. बॅगमध्ये एक लाख पाच हजार रुपये रोख तसेच चेकबुक व पासबुक असल्याचे निष्पन्न झाले असून, घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, नांदुरा तालुक्यातील पलसोडा येथील रहिवासी दिनेशसिंह हिंमतसिंह राजपूत (६३) हे त्यांच्या सुनगाव येथील नातेवाईक चैनसिंग राजपूत यांच्यासोबत चहा पिण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये आले होते.त्यांच्याजवळील लेदर बॅगमध्ये एक लाख पाच हजार रुपये रोख रक्कम, चेकबुक व पासबुक होते. टेबलवर बसल्यानंतर बॅग बाजूला ठेवून ते चहा घेत असतानाच, संधी साधून अज्ञात चोरट्याने बॅग लंपास केली.चहा पिने झाल्यानंतर पैसे देण्यासाठी उठताना बाजूला ठेवलेली बॅग दिसून न आल्याने त्यांनी आजूबाजूच्या नागरिकांकडे चौकशी केली; मात्र कोणालाही माहिती मिळाली नाही. त्यानंतर दिनेशसिंह राजपूत यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शोध पथकाचे प्रमुख मिलिंद जवंजाळ करीत आहेत.

# संत परमहंस परशराम बाबा पुण्यतिथीनिमित्त अकोला ते अंतरगाव पायी पालखी

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अकोला** : श्री संत परमहंस परशराम बाबा पुण्यतिथीनिमित्त अकोला ते अंतरगाव (शिवाजी) पायदळ पालखी सोहळा सोमवार ०२ ते ०३ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. पालखी सोहळ्याचे हे १९ वे वर्ष आहे.



पालखी पुरुषोत्तम खंडार विठ्ठल नगर मोठी उमरी अकोला येथून निघेल. पालखी सोहळ्यात विणेकरी रामकृष्ण महाराज सोमराळ (अंतरगाव), (मृदुंगाचार्य) ह.भ.प. गोकुल महाराज शेगोकर (अकोट), हनुमंतराव तांबस्कर (अमरावती),(चोपदार):- ह.भ.प भीमराव महाराज कांगटे (घुसर), (गायक) रामचंद्रभाऊ वानखडे (अंतरगाव), दुर्गेश बहुरासी (अकोला), योगेश शेगोकर (अकोट), गौतम दामोदर (सुकळा), हलगी (डफळी) वादक दीपकभ पाटेकर (यावलखेड) यांचा सहभाग असेल. परमहंस परशराम महाराज पालखी सोहळ्यात अकोला ते पिंपळोदरम्यान अल्पोहार सेवा अंकुश बाळापुरे (अकोला), किशोर पुसदकर (अकोला), दत्ताभाऊ कांगटे (घुसर),विठ्ठलराव झटाले (घुसर), उज्वल पागृत (घुसर), धीरज कांगटे (घुसर)आदी मान्यवर सेवा प्रदान करतील.

तसेच श्री तीर्थक्षेत्र परमहंस परशराम महाराज मंदिर लाखोंडा येथे शंकरराव खवले (लाखोंडा), बाळूभाऊ सरतकर (लाखोंडा), किसनराव भांडे (म्हातोडी), झटाले (दोन वाडा) येथे सेवा प्रदान करतील. तसेच श्री संत परमहंस परशराम बाबा समाधी मंदिर पिंपळोद येथे प्रशांत देशमुख (पिंपळोद), महादेव वाकोडे (पिंपळोद)(अन्नदाते) येथे सेवा प्रदान करतील. तसेच श्री परमहंस परशराम बाबा मंदिर आयटीया पिंपळोद, श्री तीर्थक्षेत्र परमहंस परशराम बाबा जलकुंड मंदिर पिंपळोद येथे राजूभाऊ कथलकर, अंतरगाव सेवा प्रदान करतील. तसेच दि.०३ मार्च २०२६ रोजी बाबांच्या पालखीची अंतरगाव मध्ये मिरवणूक श्री परमहंस परशराम बाबा मंदिर अंतरगाव (शिवाजी) आरती व गोपालकाला आणि गुलाबराव वाघ (अंतरगाव) अन्नदाते, सौ मीनाबाई तांबस्कर सेवा प्रदान करण्यात येईल, तरी बाबांच्या दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुरुषोत्तम अंबादासजी खंडार उर्फ गुरुदेव यांनी केले आहे.

# संकल्प प्रतिष्ठान तर्फे समाजसेवेचा गौरव आणि पर्यावरणाचा जागर



प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अकोला** : सामाजिक जाणीव जपत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणारा श्री संकल्प मित्र परिवार प्रतिष्ठान, अकोला यांचा १० वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात संत गजानन महाराज व कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा ज्येष्ठ रंगकर्मी सुधाकरराव गीते उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्रा. किशोर बुटोले, श्री. निलेश गुप्ता आणि श्री. सुरेश मो. राठी यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी 'बळीराजा सेवासन्मान पुरस्कार' श्री. अशोक करवते (सहाय्यक कृषी अधिकारी, अकोला) यांना प्रदान करण्यात आला. तसेच 'सेवाभावी उद्योजक पुरस्कार' श्री. वैभव दिलीपराव वानखडे (अध्यक्ष, सेवा फाउंडेशन, अकोला) यांना देऊन गौरविण्यात आले.

याचबरोबर 'संकल्प सेवा सन्मान पुरस्कार' अंतर्गत श्री. संतोष म. बायस्कर (संस्थापक अध्यक्ष, कर्मयोगी गाडगेबाबा रक्तदाता संघ, वाशिम), सौ. कांचन पटोकर, डॉ. प्रदीप अवचार (संचालक, ओपन विंग्स, अकोला), सौ. राजश्री प्रशांत देशमुख (अध्यक्षा, देशमुख महिला मंडळ, अकोला), श्रीमती अनिता हरिराम इंगळे (दिव्यांग व एकलपालक गरजू विद्यार्थ्यांची सेवा, मुर्तीजापूर) तसेच श्री. विजयकुमार धरमकर (संचालक, श्रीनाथ वृद्धाश्रम, दहिगाव ता. तेल्हारा) यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी दहाव्या वर्धापन

# मोठ्याने लहान भावाची हत्या करून मृतदेह जाळला ; अस्थीही विसर्जित

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

## राहुड येथील घटना

**खामगाव** : कौटुंबिक वादातून मोठ्या भावानेच लहान भावाची निघृण हत्या करून मृतदेह जाळल्याचा आणि पुरावे नष्ट करण्यासाठी अस्थी पूर्णा नदीपात्रात विसर्जित केल्याचा प्रकार पिंपळगाव राजा पोलीस ठाणे हद्दीतील राहुड येथे गुरुवार, २६ फेब्रुवारी रोजी उघडकीस आला. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून, समाजमन सुन्न झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राहुड येथील चेतन संजय इंगळे (वय ३५) व त्याचा मोठा भाऊ रोशन संजय इंगळे (वय ३६) यांच्यात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाद सुरू होते. आरोपी रोशनला दारूचे व्यसन होते. चेतन हा शेतीकामात व्यस्त राहत शांत स्वभावाचा असल्याची गावात ओळख होती. मात्र दारूच्या नशेत रोशन कडून वारंवार वाद होत असल्याचे समोर आले आहे. तसेच चेतनच्या चारित्र्यावर संशय घेतल्याने दोघांतील वाद अधिक तीव्र झाल्याची चर्चा होती. चेतन बुधवारपासून बेपत्ता असल्याची माहिती राहुड चे पोलिस पाटील विलास बनसोडे यांनी पिंपळगाव राजा पोलिस ठाण्यात दिली. त्यानंतर ठाणेदार भागवत मुळीक यांनी तातडीने विशेष पथक स्थापन करून शोधमोहीम सुरू केली. चेतन चा ठावठिकाणा न लागल्याने त्याचा भाऊ रोशन याची कसून चौकशी करण्यात आली. चौकशीत समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने पोलिसांचा संशय बळावला होता.चौकशीदरम्यान रोशन ने गुन्ह्याची कबुली दिली. दि. २५ फेब्रुवारीच्या रात्री १२ ते १ दरम्यान गावालगतच्या स्वतःच्या शेतात लोखंडी रॉडने डोक्यावर वार करून चेतनची हत्या केल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर मृतदेह जाळून पुरावे नष्ट केले. तसेच जळालेल्या अस्थी येरळी जवळील पुलावरून पूर्णा नदीपात्रात विसर्जित केल्याची कबुली दिली.पोलिसांनी घटनास्थळी फॉरेन्सिक पथक (खामगाव) व श्वान पथक (अकोला) यांना पाचारण करून तपास केला. घटनास्थळी मानवी अवशेष आढळून आले. तपासादरम्यान मुख्य आरोपी रोशन इंगळे याच्यासह त्याला मदत करणारा रवी राऊत (३५, रा. खामगाव) यालाही अटक करण्यात आली आहे.या प्रकरणात आरोपींविरुद्ध खुनासह पुरावे नष्ट केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), २३८, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आणखी आरोपी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. याप्रकरणी पुढील तपास पिंपळगावराजा पोलिस करीत आहे.


५ गुरूवार दि. २१डिसेंबर २०२३ सिटी न्यूज सुपरफास्ट
नागरिकांचा केला जातो 'घात', वसुलीत अनेकांचे 'हात'...
पैशाशिवाय नाही पडताळल्या 'जात'!
* जात पडताळणीसाठी द्या दाम, तरच काम, नाहीतर राम-राम
●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●
समाजकल्याण मधील जात पडताळणी विभागाला भ्रष्टाचाराच्या वाळविणे पोखरून टाकले आहे. जात पडताळणीसाठी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. समाजकल्याण कार्यालयातील जात पडताळणी विभागात आता पर्यंत १३५७ जात वैधता प्रमाण पत्राचे प्रकरणे प्रलंबित आहे. ते निकाली काढण्यासाठी या विभागातील अधिकारी जाणीव पूर्वक विलंब करीत आहेत.

## जाता जात नाही तीही 'जात', पडताळल्या जात नाही तीही 'जात'...

# जातीसाठी माती नव्हे, तर पैसे खातात !

## *जातीला लूटण्यासाठी त्याच जातीचे दलाल * अधिकारी व दलाल मालमाल

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

पुरोगामी समजणाऱ्या महाराष्ट्राला जाती पातीच्या राजकारणाने पोखरले आहे. आरक्षणाच्या नावाखाली जाती पातीत मानवता विभागल्या जात आहे. आरक्षण देणे तर सोडा जात पडताळणीसाठी त्याच जातीचे दलाल त्याच जातीच्या लोकांना लुटून अधिकाऱ्यांना मालामाल करीत आहेत. ऐरवी जातीसाठी माती खाऊ असे म्हणणाऱ्या भाडखाऊ दलालांनी जात पडताळणीसाठी अनेकांना त्रस्त केले आहे. जाता जात नाही तीही जात अन् समाज कल्याण विभागात पैशाशिवाय पडताळल्या जात नाही तीही जात अशी म्हणण्याची वेळ आली आहे. कारण समाजकल्याण कार्यालयातील जात पडताळणी विभागात आता पर्यंत शेकडो जात वैधता प्रमाण पत्राचे प्रकरणे प्रलंबित आहे. ते निकाली काढण्यासाठी या विभागातील अधिकारी जाणीव पूर्वक विलंब करीत आहेत.

जात प्रमाणपत्र पडताळणी विभागात अनेक विध्यार्थी, निवडणुकीस सामोरे जाणारे उमेदवार यांना अनेक दिवसांपासून जात प्रमाणपत्र समितीकडे त्रुटीची पूर्तता करून सुद्धा जात पडताळणी विभागामार्फत त्या प्रकारासाठी पैसे दिल्या शिवाय जात पडताळणी होत नसल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यामुळे अधिकारी हेतूपुरस्पर जात पडताळणी करण्यासाठी विलंब लावत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नौकरी शिक्षण संबंधात अनेक अडचणी येत आहेत तसेच ग्रामपंचायत निवडणुकी संदर्भात अनेक निवडून आलेले उमेदवार दिलेल्या वेळेत आपले जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करू न शकल्या मुळे त्यांना आपल्या पदाकरीता अपात्र ठरविण्यात आले.

मात्र, आर्थिक देवाण घेवाणातून



अपात्रांनाही पात्र दाखविण्यात येत आहे. लक्ष्मीदर्शनाशिवाय जात पडताळणी अधिकारी कागदाचे दर्शनही करत नाहीत. जात पडताळणीच्या कामासाठी अधिकाऱ्यांनी ठरावीक दलाल ठेवले असून प्रत्येक कामाचा रेट ठरला आहे. ग्रामपंचायत सदस्याची जात पडताळणी करायची झाल्यास १५ ते २० हजार रूपये रेट द्यावा लागतो. राजकीय लोकांनाही जात पडताळणीसाठी त्रास सहन करावा लागतो, तर सामान्य विद्यार्थ्यांची काय स्थिती असेल हे यावरून सिध्द होते. दाम न देता एकाही व्यक्तीची जात पडताळणी झाली असे शोधूनही सापडणार नाही, थेट राजकारणाही जात पडताळणीसाठी दाम दिल्याचे सिटी न्युज सुपरफास्टशी बोलून दाखविले. आता सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्त मालिकेनंतर विविध राजकीय व सामाजिक संघटना जात पडताळणी विभागाच्या विरोधात निवेदने देवून रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहेत. अगोदरच विविध जातीच्या आरक्षणासाठी सामाजिक संघटना रस्त्यावर उतरल्या असतांनाही जात पडताळणीसाठी भ्रष्ट अधिकारी दाम देवूनही त्रुटीच्या नावाखाली त्रास देत असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या व सामाजिक संघटनेच्या सहनशिलतेचा अंत संपला असून आता नागरिक स्व:ताहून मोठे आंदोलन उभारण्याच्या तयारीत आहेत.

## थोडक्यात

### शेख हंजला अलि याचा रमजान महिन्यातील पहिला रोजा उत्साहात

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

रिसोड येथील मोमीनपुरा निवासी शेख जुनेद यांचा मुलगा चार वर्षीय शेख हंजला अली याने पवित्र रमजान महिन्यात आपला पहिला रोजा दि.२० फेब्रुवारी रोजी पूर्ण करून कुटुंबीयांचा आणि नातेवाईकांचा आनंद द्विगुणित केला. एवढ्या लहान वयात रोजा ठेवण्याची त्याची इच्छा पाहून घरातील सर्वजण भावूक झाले. हंजलाचा हा पहिला रोजा त्याच्या आयुष्यातील एक प्रेरणादायी आणि संस्मरणीय क्षण ठरला आहे.या निमित्ताने परिसरातील नागरिकांनीही त्याचे कौतुक करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. लहान वयात धार्मिक कर्तव्यांविषयी निर्माण झालेली जाणीव आणि श्रद्धा समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.



### सैय्यद एहतेशाम व आदिना फातेमा या चिमुकल्यांनी ठेवला रोजा

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर पवित्र रमजान महिन्यानिमित्त रोजा, नमाज आणि प्रार्थनेचे वातावरण सर्वत्र पहायला मिळत आहे. या धार्मिक वातावरणात सैय्यद एहतेशाम व आदिना फातेमा या दोन चिमुकल्यांनी रोजा ठेवून सर्वांचे लक्ष वेधले आहे. हे दोन्ही चिमुकले मंगरूळपीर येथे राहतत येथील मुस्लिम बांधवांनी पवित्र सण रमजान ईद निमित्त रोजा ठेवला असून यामध्ये लहान बालकांनी सुद्धा सहभाग नोंदविला जनता इंजीनियरिंग परिवारातील दोन बालक ,सैय्यद एहतेशाम आदिना फातेमा यांनी सुद्धा २१ फेब्रुवारी ला लहान वयात असूनही या चिमुकल्यांनी धार्मिक संस्कारांबद्दलची जाणीव दाखवून, संयम आणि श्रद्धेने रोजा पूर्ण केला. कुटुंबीयांनी मुलांचे प्रोत्साहन केले आणि त्यांचे कौतुक केले. समाजातील नागरिकही या दोन चिमुकल्यांचे अभिनंदन करत आहेत. लहान वयातच संयम, श्रद्धा आणि शिस्त यांचे अद्भुत उदाहरण त्यांनी समाजासमोर मांडले आहे, असे नागरिक म्हणतात.



### शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. नागरिकांना योजनांची अचूक माहिती मिळाल्यास त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडू शकतो, असे प्रतिपादन परिविक्षाधीन भाप्रसे अधिकारी तथा कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा यांनी केले.

सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन श्री .वर्मा यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, तहसीलदार रवी महाले, गटविकास अधिकारी पुनम राणे,जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटुडे-राऊत तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उद्घाटनप्रसंगी उपविभागीय अधिकारी श्री वर्मा म्हणाले की, शासनाच्या योजना केवळ कागदावर मर्यादित न राहता त्या प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनासारखे उपक्रम जनजागृतीसाठी प्रभावी माध्यम ठरतात आणि नागरिकांमध्ये योजनांबाबत विश्वास निर्माण करतात. समाजातील अनुसूचित जाती, मागासवर्गीय तसेच दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा.

## वर्ल्ड कप २०-२० क्रिकेट सट्ट्याची धूम...


# अवैध धंद्यांची खेळी, अनेकांचे जातात बळी !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात सर्वत्र अवैध धंदे विरूध्द धडाकेबाज कारवाई सुरू असूनही जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांनी धंदे बंद करण्याचे आदेश दिले. अनेक ठिकाणी अवैध धंद्याविरूध्द कारवाई होत आहे. मात्र कारवाया नंतरही जिल्ह्यात अवैध धंदे खुलेआम सुरूच असून बंदचे मात्र नावच आहे. नावालाच बंदी असून कारवाई करूनही अवैध धंद्यावाले याची संधी करीत आहेत. वर्ल्ड कप २०-२० क्रिकेटच्या सट्ट्याची धूम वाशीम, मंगरूळपीर, रिसोड सह जिल्ह्यात ठिकठिकाणी सुरू आहे. शहरातील अवैध धंदे आता ग्रामीण भागात पोहोचले असून अवैध धंद्याची कलाच न्यारीच असून त्यात पोलिसांची भागेदारी सुरू आहे. अवैध धंद्यांच्या खेळीने मात्र, अनेकांचे बळी जात आहेत.


जिल्ह्यासह वाशीम शहरात वर्ल्डकप २०-२० क्रिकेटवर सट्टा लावल्या जात आहे. शहरातील सट्ट्याकडे पोलिसांचे अर्थपुर्ण दुर्लक्ष असून पोलिसांमुळेच सट्ट्याला बट्टा लागलेला आहे. जिल्हा पोलिस



अधीक्षकांचे बंदचे आदेश आदेश झुगारून जिल्ह्यात ठिकठिकाणी अवैध धंदे सुरू आहेत. अवैध प्रवाशी वाहतुकीचाही कळस गाठला आहे. रस्त्यावर नावालाच वसुलीसाठी पोलिस उभे आहेत. जीवनाची लढाई दारूमुळे नागरिक हारत आहे. अवैध दारू वाहतुकीसाठी लहान मुलांचा वापर होत आहे. ग्रामीण भागात देशी दारूच्या




भट्ट्या उभारल्या आहेत. ज्यादा दराने बनावट दारूची विक्री सुरू आहे. गुटख्याला रेड सिंग्नल असतांना जिल्ह्यात मात्र ग्रिन सिंग्नल मिळत आहे. जिल्हा हे अवैध गुटख्याचे हब बनले आहे.त्यामुळे अवैध धंदे बंद करून आपल्या विभागातील फितूर पोलिस अधिकारी व कर्मचारी शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



### शहरात आयपीएल क्रिकेटचा सट्टा, ग्रामीण भागात अवैध धद्यांने लावला बट्टा

वर्ल्ड कप २०-२० क्रिकेट सुरू झाल्यापासून वाशीम शहरासह मंगरूळपीर, कारंजा, मालेगाव, रिसोड येथे सट्ट्याचे मोठ्याप्रमाणात पेव फुटले आहे. शहरातील हे धंदे आता ग्रामीण भागात सुरू झाले आहेत. शहरापुरता असलेला क्रिकेट सट्टा व अवैध धंदे आता ग्रामीण भागात सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवन उध्दवस्त होत आहे.

कारण अवैध धंद्यांच्या खेळीने अनेकांचे बळी जात आहेत.

## रिसोड बसस्थानकात NCMC स्मार्टकार्ड पॉईंटचे उद्घाटन

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत डिजिटल परिवर्तनाला चालना देणाऱ्या ल्ल्श – नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड स्मार्ट कार्ड पॉईंटचे उद्घाटन गुरुवारी रिसोड बसस्थानक येथे . आगार व्यवस्थापक निलेश बोदडे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.यावेळी वाहतूक निरीक्षक आश्रू काळे व कार्यशाळा अधीक्षक सतीश वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर टोंचर उपस्थित होते. हा उपक्रम एमएसआरटीसी मार्फत राबविण्यात येत असून प्रवाशांना एकाच कार्डद्वारे तिकीट खरेदी, पेमेंट तसेच शासनमान्य सवलतींचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.कार्यक्रमास डॉ. रवींद्र मोरे पाटील, आरोग्य व शिक्षण सभापती संतोष भाऊ चराटे, बबन पाटील गारडे, कपिल पाटील कदम, प्रशांत पाटील खराटे, अर्जुन पाटील खरात, जयंत वसमतकर, प्रताप पाटील



लांडे, राजूभाऊ खांबलकर, पंकज देशमुख, सुनील खंडेलवाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्डद्वारे ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, ७५ वर्षांवरील मोफत प्रवास धारक तसेच महिला सन्मान योजनेतील लाभार्थ्यांना सवलतीचा लाभ घेण्यासाठी कार्ड अनिवार्य करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. लवकरच दिव्यांग व विद्यार्थ्यांसाठीही ही अट लागू होणार असल्याचे सांगण्यात आले.उद्घाटनानंतर अनेक नागरिकांनी ऑन-द-स्पॉट नोंदणी करून कार्ड काढले. नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


## लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करा - डॉ अनिल कावरखे

### जिल्हा सल्लागार समितीची बैठक

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

कन्याभृणहत्या आणि बिघडते लिंग गुणोत्तर हा समाजासमोरील गंभीर प्रश्न असून, या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग निवडीस प्रतिबंध घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा वैद्यकीय गर्भपात अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविषयी खात्रीशीर माहिती दिली.आणि त्या आधारे गुन्हा उघडकीस आला, तर संबंधित माहितीदारास रु. १ लाखांचे बक्षीस



देण्यात येणार आहे. ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात असून, तिचा उद्देश कन्याभृणहत्या थांबवणे, लिंग गुणोत्तर सुधारणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.आज दि.(२६) रोजी जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय सल्लागार समिती अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. अनिल कावरखे , ॲड. डॉ .शिवनंदा आम्ले, डॉ.जया बिबेकर, डॉ.जे.एस.बाहेती, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया आदी उपस्थित होते.

गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायद्याअंतर्गत राबविलेल्या यशस्वी कारवाईबाबत माहिती देणाऱ्या नागरिकास एक लाख रुपये बक्षीस दिले जाईल. माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल आणि संबंधिताची ओळख सुरक्षित राहील.

veeWoCeermee"er ttps://amchimulgimaha .in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. संपर्कासाठी: राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १०४, १८००२३३४४७५ वर संपर्क साधता येईल. सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून या योजनेचा लाभ घ्या - तुमच्या माहितीद्वारे एका चिमुकल्या जीवाला जीवनदान मिळू शकते.

## निराधार योजनेत बोगस लाभार्थ्यांनाच 'आधार'!

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

महसुल विभागाच्या संगायोमध्ये विविध योजनेमध्ये काही लाभार्थी बोगस आणी खोटे कागदपत्रे सादर करुन शासनाचा निधी हडप करन्याचा सर्रास प्रकार सुरु असुन महसुल विभागाने याविषयी 'ऑपरेशन वॉश आऊट' राबवुन खोटे लाभार्थी शोधून त्यांना आवश्यक कागदपत्रे बोलन्यासाठी नोटिसा पाठवून सुनावन्या घेन्याचे ठवताच काही दलालांचा तिळपापड झाला असुन आपल्या बोगस लाभार्थ्यांचा अनूदान बंद होवू नये म्हणून तक्रारी,निवेदने देवून प्रकरण कसे दाबता येईल याचा आटोकाट प्रयत्नही केला जात असल्याचे समजते.

संगायो कार्यालयात संजय गांधी निराधार योजना,श्रावळबाळ योजना,कुटुंब अर्थसहाय्य योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना शासनाकडून अनूदान देन्यात येते.परंतु



मंगरुळपीरच्या या संगायो विभागात बऱ्याच प्रमाणात बोगस लाभार्थी घुसवल्याचा प्रकार झाल्याने सबंधीत अधिकारी यांनी असे बोगस लाभार्थी शोधन्यासाठी मोहीम राबवणे सुरु केले.

यासाठी त्रुटी वाटलेल्या लाभार्थ्यांना नोटीसा पाठवून त्यांची सुनावणी घेवून कागदपत्रांची पडताळणी सुरु आहे. खोटे जन्मदाखले, कुटुंब अर्थसाहाय्य योजनेमध्ये लाभ घेन्यासाठी काहींनी

### *बोगस लाभार्थ्यांचा अधिक भरणा
### *शासनाला दरमहा लाखोचा चुना
### *दलाल सक्रीय ; चौकशीची मागणी

खोटे व बोगस दारिद्य रेषेचे कार्ड, खोटे, खोडतोड केलेले मृत्यु दाखले, आवश्यक कागपत्रत खोडतोड, खोटे दुर्धर आजाराचे प्रमाणपत्रे, विधवा, परितक्तयाचे खोटे दाखले असे प्रकार करुन शासकिय अनूदान लाटन्याचा प्रकार होत असुन या रॅकेटमध्ये काही दलाल सक्रीय असुन या बोगस कामावर आता प्रशासकीय यंत्रणेने अंकुश लावणे गरजेचे आहे. एकट्या वाशिम जिल्ह्याचा विचार केल्यास वर्षाकाठी सहा ते सात कोटी रुपये बोगस लाभार्थ्यांच्या घशात जात असल्याने खरे लाभार्थी मात्र वंचितच राहत असल्याने ही योजना कीतपत सफल होतेय याची कल्पना न केलेली बरी.संगायोच्या लाभार्थ्यांची सखोल पडताळणी होवून पात्र व खऱ्या लाभार्थ्यांना अनूदान पोहचवन्यासाठी प्रशासनाने प्रक्रीया करणे गरजेचे असल्याने जिल्हाधिकारी यांनी लक्ष देवुन योग्य कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

## पाणवठे पडले कोरडे ;वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वनपरिक्षेत्र मधील भयाण वास्तव्य. वन्य प्राण्यांची नागरी वस्ती कडे धाव. मेडशी गावाच्या पश्चिमेस खूप मोठे जंगल आहे.तिथे खूप सारे वन्य प्राणी वास्तव्यास आहेत.मोर, हरीण,रोही, नीलगाय, रानडुक्कर यांच्यासह बिबट, कोल्हे, बहुसंख्य पक्षी सुद्धा आहे. सदर प्राण्यांना पिण्याच्या पाण्याचा साठा जे छोटे तलाव, धरण जंगला लागत होते हे अखेरीस आटून गेले त्यामुळे जंगलातील प्राण्यांसाठी पिण्याचा प्रश्न उपस्थित झाला. पाणवठे सुद्धा तयार करण्यात आले आहे. मात्र ते पाणवठे कोरडेच आहेत. दिवसे न दिवस उन्हाचा तडाखा वाढतच चालला आहे. त्यामुळे वनपरिक्षेत्रातील पशू, पक्षी ह्यांनी पाणी पियाचा कुठ हे अवघड जागेवरच दुखणं जंगलातील मुक्या जनावरांना करिता होऊन बसला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# मनपा तिजोरीच्या चाव्या विजय अग्रवाल यांच्या हातात जाणे निश्चित

♦ आरती घोगलीया होणार महिला व बालकल्याण विकास समितीच्या सभापती ♦ एकतर्फी निवडणूक न होऊ देण्याचा काँग्रेसचा निर्धार

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अकोला :** महापालिकेच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समिती सभापती पदाचा सस्पेन्स अखेर संपनार आहे. महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या आता भाजपा चे वरिष्ठ आणि अनुभवी विजय अग्रवाल यांच्याकडे जाणे जवळपास निश्चित झाले आहे. सोबतच, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी शहर सुधार आघाडीच्या तसेच भाजपाच्या नगरसेविका आरती प्रकाश घोगलिया यांना संधी मिळणे जवळपास निश्चित झाले आहे. देण्यात आली आहे. गुरुवारी दुपारी नगरसचिव यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. विजय अग्रवाल यांनी तीन, तर आरती घोगलिया यांनी दोन अर्ज सादर केले. महापालिकेत महापौरपदानंतर सर्वात महत्त्वाचे स्थायी समितीचे सभापती पद असते. या पदावर कोण विराजमान होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. हरीश अलीमचंदानी आणि विनोद मापारी यांचेही नाव चर्चेत होते. भाजपने गुरुवारी विजय अग्रवाल यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. नगरसचिवांकडे अग्रवाल यांनी तीन तर महिला व बालकल्याण सभापती पदासाठी आरती घोगलिया यांनी दोन अर्ज दाखल केले. यावेळी महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे भाजपचे गटनेते पवन महल्ले बालाणी, तसेच शहर सुधार आघाडीचे अन्य पदाधिकारी आदी उपस्थित होते ही निवडणूक बिनविरोध न होण्यासाठी काँग्रेसने सुद्धा पावले उचलली आहेत काँग्रेस तर्फे स्थायी समिती सभापती पदासाठी मोहम्मद फजलू मोहम्मद करीम यांना स्थायी समिती सभापतीच्या निवडणुकीत उतरवले आहे. शहर सुधार आघाडी प्रत्येक टप्प्यावर विरोध करायचा यासाठी यासाठी काँग्रेसने सुद्धा आव्हान उभे केले आहे आता अर्ज छाननी नंतर अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट होणार असून सभापतींच्या निवडीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे अकोल्याच्या राजकारणात पुढील काही दिवस निर्णायक ठरणार हे मात्र निश्चित. या निवडणुकीत सुद्धा काँग्रेसला हार पत्करावी लागेल हे निश्चित आहे परंतु 'डरकर हरने से लडकर हरना' केव्हाही योग्य या या नीतीवर काँग्रेस विरोधी पक्षाची भूमिका अगदी योग्य बजावत आहे. प्रभाग समित्यांच्या सभापती पदासाठी ही नगरसेवकांमध्ये उत्साह दिसून येत आहे प्रभाग समिती पूर्वसाठी रश्मी प्रशांत अवचार तर प्रभाग समिती पश्चिम साठी राजेश्वर केशव धोटे यांनी प्रत्येकी दोन अर्ज सादर केले आहे प्रभाग समिती उत्तर साठी काँग्रेसच्या जैनन बी शेख इब्राहिम यांनी एक नाम निर्देशन पत्र दाखल केले आहे तर प्रभाग समिती दक्षिण साठी शहर सुधार आघाडीच्या पूजा पंकज गावंडे यांनी दोन नामनिर्देशन पत्रे सादर करून आपला दावा मजबूत केला आहे. स्थायी समिती सभापती आणि अन्य सभापती पदासाठी २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे जिल्हाधिकारी वर्षा मीना पिठासीन अधिकारी असतील या सभेत स्थायी समिती सभापती तसेच सर्व नवनियुक्त सभापतींच्या नावाची औपचारिक घोषणा केली जाईल

## माजी महापौर विजय अग्रवाल यांचा उमेदवारी अर्ज

झोन समिती सभापती पदासाठीही अर्ज प्रक्रिया पूर्ण



प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अकोला :** महानगरपालिकेमध्ये विविध समित्यांच्या सभापती पदासाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून, आज उमेदवारांकडून नामनिर्देशन पत्रे सादर करण्यात आली आहेत. केवळ स्थायी समितीसाठी शहर सुधार आणि काँग्रेसमध्ये चुरस असून ती देखील काँग्रेसचा पराभव अधोरेखित करणारी ठरणार आहे. अकोल्याच्या राजकारणातील चाणक्य म्हणून सुपरिचित आणि अकोला महापालिकेत भाजपची सत्ता स्थापन करण्यात महत्वाचा केंद्र बिंदू असलेले विजय अग्रवाल पुन्हा एकदा स्थायी समिती सभापती म्हणून विराजमान होणार आहे. शहर सुधार आघाडीच्या वतीने आज विजय अग्रवाल यांनी अर्ज दाखल केला आहे.

यावेळी त्यांच्या सोबत महापौर, गटनेता आदींची उपस्थिती होती. तर काँग्रेस तर्फे स्थायी समिती सभापती पदासाठी मोहम्मद फजलु अब्दुल करीम यांनी देखील अर्ज दाखल केला असून काँग्रेस उमेदवाराच्या विजयाची शक्यता धुसर असल्याचे राजकीय नेत्यांचे म्हणणे आहे. महिला व बाल कल्याण सभापती पदासाठी आरती घोगलेया, पुर्व झोन सभापती पदासाठी रश्मी अवचार, पश्चिम झोन सभापती पदासाठी राजेश्वर धोटे, काँग्रेस च्या जैनब बी शेख इब्राहिम यांनी उत्तर झोन सभापती पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

तर शहर सुधार समितीच्या वतीने दक्षिण झोन सभापतीपदासाठी पुजा गावंड यांनी अर्ज दाखल केला आहे. शहर सुधार आघाडी च्या वतीने विविध समित्यांच्या सभापती पदासाठी प्रमुख राजकीय पक्षांनी आपले उमेदवार रिंगणात उतरवले असून, नामनिर्देशन प्रक्रियेमुळे महानगरपालिकेत राजकीय हालचालींना वेग आला आहे. महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, नगर विकास आघाडीचे सुनील मेश्राम, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे रफीक सिद्दीकी, जयंत मसने आदी उपस्थित होते.

## अकोला कच्छी मेमन जमात तर्फे इफ्तार कार्यक्रम

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी



**अकोला :** कच्छी मेमन जमात तर्फे मोहम्मद अली चौक येथील के एम टी हॉलमध्ये भव्य इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम हजरत सैयद जाहिरुल इस्लाम जकीमिया नक्शबंदी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच हाजी मुदाम साहेब यांच्या सरपरस्तीमध्ये पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवर व पाहुण्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत अकोला कच्छी मेमन जमात व कच्छी मस्जिदचे अध्यक्ष जावेद जकारिया यांनी केले. जमाततर्फे सर्व अतिथींचे आत्मीय स्वागत करण्यात आले, त्यामुळे कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत सौहार्दपूर्ण व दिमाखदार झाले.

कार्यक्रमास प्रशासन, लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार यांची उपस्थिती लाभली. अकोला येथील अतिरिक्त पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, रामदासपेठ पोलिस स्टेशनचे ठाणेदार शिरीष खंडारे तसेच सिटी कोतवालीचे पोलिस निरीक्षक संजय गवई उपस्थित होते. राजकीय क्षेत्रातून भारतीय जनता पक्षाचे नेते विजय अग्रवाल, सिंधी समाजाचे ज्येष्ठ सदस्य कनायलाल रंगवानी, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी चे प्रदेश उपाध्यक्ष मदन भरगड, राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचन्द्र पवार चे जिल्हाध्यक्ष संग्राम गवांडे, महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी, कार्याध्यक्ष देवनाद ताले, राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे शहराध्यक्ष करण दोड, अकोला पश्चिम अध्यक्ष महमूद खान पठाण, महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते डॉ. झीशान हुसेन, माजी उपमहापौर निकलेश दिवेकर, वंचित बहुजन आघाडी चे प्रदेश महासचिव व प्रवक्ते राजेंद्र पातोडे, नगरसेवक फैय्याज खान व नगरसेवक सय्यद वसीम, पंकज गवांडे, यांची विशेष उपस्थिती होती.

याशिवाय शंकर लंगोट, गायकवाड साहेब, दंडले साहेब, सिद्धार्थ सिरसट, फारूक चव्हाण, जावेद खान, शाबाज खान, प्रभजीत सिंग बछर, राशिद खान आगरे वाला, तनवीर अहमद खान, ॲड. एस. एस. ठाकूर, आरोग्य अधिकारी प्रशांत राजुरकर, ज्येष्ठ पत्रकार विलास खंडारे, भाजपा अल्पसंख्यक महानगर अध्यक्ष जमीर खान, यासीन देदा, जमात चे सहसचिव वाहिद मुसानी, सुफियान डोकडिया, शारिक डोकाडिया, प्रा. मोहन खडसे, प्रा. व ज्येष्ठ पत्रकार मधु जाधव, समाजसेवक रहमान बाबू, समाजसेवक नितीन सपकाळ, राजेंद्र चितलांगे, इमरान चव्हाण, शाहिद संडा, तौकीर थडी, हनीफ मलक, समीर महानवाला, समीर भुराणी, फारूक भुराणी, हुसेन मुसानी, हनीफ संडा, इकबाल गनोदवाला, आझम चव्हाण, बबलू खान, कलीम खान, आसिफ खान, चांद खान, कच्छी मेमन जमातचे माजी सचिव शफी सूर्या, माजी विरोधी पक्षनेते हाजी लतीफ खत्री, हाजी आरिफ आमदनी, हाजी अमीन गाज़ी, समाजसेवक सिराज कुरेशी व शाहिद पिंजारी उपस्थित होते.

पत्रकारितेच्या क्षेत्रातून लोकमत समाचार चे संपादक अरुण कुमार, उपसंपादक शैलेन्द्र दुबे तसेच जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकत अली मीर साहेब उपस्थित होते. इफ्तारपूर्वी हजरत सैयद जाहिरुल इस्लाम जकीमिया नक्शबंदी यांनी रमजान महिन्याचे महत्त्व स्पष्ट करत हा महिना मानवता, संयम, त्याग व बंधुभावाचा संदेश देणारा असल्याचे सांगितले तसेच देशात शांतता, सौहार्द व प्रगतीसाठी विशेष प्रार्थना केली.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने समाजबांधवांनी एकत्र येऊन इफ्तार करून एकतेचा संदेश दिला. शेवटी जमाततर्फे सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले व भविष्यातही असे सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

## तेल्हारा तालुक्यात आरटीआय कायद्याचा भंग

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**तेल्हारा :** तालुक्यात शिक्षण हक्क कायदा अंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली ऑनलाईन नोंदणी बहुतांश खाजगी शाळांनी टाळल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. शासनाच्या स्पष्ट नियमांनुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत व सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक असताना या दुर्लक्षामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरटीई कायदा २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक आहे. सर्व मान्यताप्राप्त खाजगी शाळांनी इयत्ता पहिली (किंवा प्रवेश स्तर) मध्ये किमान २५ टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क शासनाकडून संबंधित शाळांना अदा केले जाते. प्रवेश प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने ऑनलाईन प्रणालीद्वारे राबवणे अनिवार्य आहे. या सर्व अटींचे पालन करणे प्रत्येक मान्यताप्राप्त शाळेसाठी कायदेशीर बंधनकारक आहे. तेल्हारा तालुक्यातील अनेक खाजगी शाळांनी आरटीई पोर्टलवर नोंदणी केली नसल्यामुळे प्रवेश प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. नोंदणी न केल्यास संबंधित शाळा २५ टक्के राखीव जागा भरण्यापासून टाळाटाळ करू शकतात, अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे. पालकांचे म्हणणे आहे की, 'शासनाने स्पष्ट आदेश दिल्यानंतरही शाळांनी नोंदणी टाळणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन आहे.

**बहुतांश शाळांनी नोंदणी टाळल्याने पालक संतप्त**

## टीपू सुलतानचा महापालिकेतील बोर्ड हटवण्यासाठी 8 दिवसांचा अल्टिमेटम



प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

♦ शिवसेना शिंदे गट आक्रमक

**अकोला :** महापालिका सभागृहाला टीपू सुलतानचे नाव देण्या आल्याचा वाद पुन्हा पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून आज बोर्ड हटवण्यासाठी प्रशासनाने आठ दिवसांचा अवधी दिला. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. महानगरपालिका प्रशासन काय कार्यवाही करतते याकडे लक्ष आहे.

शिवसेना शिंदे गटाचे महानगर अध्यक्ष राजेश मिश्रा आणि सहकारी महापालिकेत आले होते. काल सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीपू सुलतान याने हिंदूची कत्तल केल्याचे सांगितले. त्यामुळे टीपू सुलतानचा फलक लावण्याचे काही कारण नाही. छत्रपती संभाजी महाराज, एपीजे अब्दुल कलाम तसेच महापुरुषांचे नाव द्या आमची काही हरकत नाही असे मिश्रा म्हणाले. हर हर महादेव, जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा दिल्या. या प्रकरणामुळे शहरातील राजकीय वातावरणही तापण्याची शक्यता वर्तवली जात असून, पुढील आठ दिवसांत काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हा बोर्ड महापालिका प्रशासनाने काढला नाही तर आम्ही आमच्या पध्दतीने तो काढू असा इशारा देखील देण्यात आला.

## शहरात सर्वत्र फोफावले वरली मटक्याचे अड्डे

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

♦ वरली मटका ने अनेकांचे संसार उध्वस्त

**अकोला :** पोलीस प्रशासन सातत्याने जिल्ह्यातील वरळी मटका, अवैध दारू विक्री आणि तीन पट्टी जुगार यांसारखे अवैध व्यवसाय बंद केल्याचा दावा करत असले तरी, प्रत्यक्षात प्रत्यक्षात उलटे दिसते. शहरांपासून ग्रामीण भागात वरळी मटका व्यवसाय उघडपणे सुरू आहेत. मटक्याच्या माध्यमातून जलद आणि मोठ्या रकमेच्या आमिषाने अनेक कुटुंबे रस्त्यावर आली आहेत. काही प्रकरणांमध्ये लोकांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊलही उचलले आहे. काही भ्रष्ट पोलिस अधिकाऱ्यांकडून या अवैध व्यवसायांना आश्रय मिळत असल्याची चर्चाही व्यापक आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक एक समर्पित अधिकारी म्हणून ओळखले जातात. जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर कारवाई करून एक मजबूत छाप पाडली, ज्यामुळे अनेक बेकायदेशीर व्यापाऱ्यांनी त्यांचे व्यवसाय तात्पुरते बंद केले. परंतु कालांतराने, हे व्यवसाय पुन्हा सुरू झाले आहेत. आणि आज परिस्थिती अशी आहे की रस्त्यावर आणि परिसरात वरळी मटका उघडपणे चालवला जात आहे. आर्थिक अडचणींमुळे नागरिक अधिक पैसे कमावण्याच्या आशेने जुगाराकडे वळत आहेत. यामध्ये महिलांचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे. अनेकांनी कर्जबाजारी होऊन आत्महत्या सुद्धा केल्या आहेत. ज्याप्रमाणे नापिकी झाल्याने शेतकरी आत्महत्या करतात त्याचप्रमाणे वरली मटका सारखे व्यवसाय देखील नागरिकांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरत आहेत का? हा प्रश्न निर्माण होत आहे. अनेक बेरोजगार तरुणही या बेकायदेशीर व्यवसायाकडे आकर्षित होत आहेत. या व्यवसायामुळे अनेकांना दारूचे व्यसन सुद्धा लागत आहे. विशेषता ज्या ठिकाणी वरली मटका चे अड्डे सुरू आहेत तेथील नागरिकांना सुद्धा येथे वरली खेळण्यासाठी दुरून दुरून येणाऱ्या नागरिकांचा त्रास सहन करावा लागत आहे. उशिरा रात्रीपर्यंत शहरात टेबलवरली मटक्याचे अड्डे बिनधास्त सुरू आहेत विशेषता जुने शहरातील सोनटक्के प्लॉट, नवाबपूरा, शिवसेना वसाहत, वाशिम , खदान, वसंत टॉकीज मागील परिसरात, भाजी बाजारात बिनधास्तपणे वरली अड्डे सुरू आहेत. शहरात मोबाईल वर सुद्धा वरली मटका घेतला जात आहे. सध्या परिस्थिती अशी आहे की टेबलावर चालणारा वरली मटका आता मोबाईल फोनद्वारे चालवला जात आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक बेकायदेशीर धंदे बंद करण्याचा बडगा उगारत असताना, काही भ्रष्ट ठाणेदारांच्या पाठिंब्याने शहरात सर्वत्र वरली अड्डे सुरू झाले आहेत.

वरली मटक्यात पैसे गमावल्याने कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत जास्त कमाईच्या आमिषाने अनेक लोकांनी जुगार खेळण्यासाठी आपली शेती, घरे आणि घरगुती वस्तू गहाण ठेवल्या आहेत.

एकंदरीत, बेकायदेशीर धंद्यांवर कारवाईचे दावे आणि प्रत्यक्ष वास्तव यात खूप तफावत आहे. हे बेकायदेशीर धंदे उघडपणे सुरू असताना, पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या गंभीर परिस्थितीची दखल घ्यावी आणि बेकायदेशीर धंद्यांवर ठोस आणि निर्णायक कारवाई करावी अशी जनतेची मागणी आहे.

## हाथों में लेकर निशाण चलारे... दुमदुमली राजेश्वर नगरी

प्रतिनिधी २७ फेब्रुवारी

**अकोला :** फाल्गुन शुक्ल एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शहरात खाटू श्याम बाबा यांच्या फाल्गुन उत्सवाचा सोहळा मोठ्या भक्तिभावाने व जल्लोषात साजरा करण्यात आला. 'श्याम बाबा की जय' च्या जयघोषाने संपूर्ण राजेश्वर नगरी दुमदुमून गेली. या निमित्ताने शहरातील राणी सती मंदिर येथून भव्य निशाण यात्रा काढण्यात आली. शेकडो भाविक भक्तांनी हातात पवित्र निशाण धारण करून श्याम नामाचा गजर करत, भजनांच्या सुरात तल्लीन होत यात्रेत सहभाग नोंदविला. महिला, पुरुष तसेच बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेचा मार्ग राणी सती मंदिर, पंचायत समिती, गांधी चौक, सिटी कोतवाली, चित्रा चौक, खोलेश्वर, परशुराम चौक, सरकारी बगीचा, अनिकट चौक मार्गे श्री रामदेव बाबा श्री श्याम बाबा मंदिर येथे समारोप झाला. मंदिरात सर्व निशाण बाबांच्या चरणी अर्पण करून महाआरती करण्यात आली. विविध समाजबांधवांच्या वतीने ठिकठिकाणी भाविकांचे पुष्पवर्षाव व अल्पोपहार देऊन स्वागत करण्यात आले.



शेकडो महिला, पुरुष व बालगोपाल झाले सहभागी




♦ श्री श्याम बाबाच्या दर्शनाला भाविकांनी अलोट गर्दी

## अकोला ते बोरगाव मंजू निशाण यात्रा

♦ अकोला श्यामभक्तांनी बोरगाव नरेशच्या चरण केले नाीन अर्पण



फाल्गुन उत्सवानिमित्त पुराना शहरातील ओल्ड सिटी ग्रुपतर्फे अकोला ते बोरगाव मंजू अशी भव्य निशाण यात्रा आयोजित करण्यात आली. डाबकी रोड येथील नंदाने मंगल कार्यालयातून सकाळी ७ वाजता श्याम बाबांच्या मनमोहक झांकीचे पूजन करून यात्रेला प्रारंभ झाला. यानंतर यात्रा गजानन महाराज मंदिर, विठ्ठल मंदिर, जय हिंद चौक, सिटी कोतवाली, खोलेश्वर, अनिकट चौक मार्गे पुढे सरकत श्री रामदेव बाबा श्री श्याम बाबा मंदिर येथे पोहोचली. येथे महाआरती व अल्पोपहारानंतर शेकडो श्यामभक्त भजनांच्या तालावर नृत्य करत बोरगाव मंजू येथील स्वयंभू श्याम बाबा मंदिरात दाखल झाले. तेथे विधिवत पूजन, अर्चन व भजनांच्या कार्यक्रमात फाल्गुन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ही निशाण यात्रा यशस्वी करण्यासाठी ओल्ड सिटी श्याम परिवाराने विशेष परिश्रम घेतले. फाल्गुन उत्सवामुळे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK